महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

जुलै ते सप्टेंबर २०२१




पुणे येथे मा. उप मुख्यमंत्री, श्री. अजित पवार यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



अहमदनगर येथे मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



धुळे येथे मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



नंदुरबार येथे मा.मंत्री, आदिवासी विकास, श्री.के.सी. पाडवी यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास



| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक, |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संतोष भांड, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | संजय घोगळे, सहा. लेखाधिकारी<br>दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>संतोष पानसरे<br>अनिल काळे |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष २ रे । अंक ५ वा । जुलै ते सप्टेंबर २०२१


## अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१ | ३ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ६ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/<br>यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |



डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

यावर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. या निमित्ताने व या अंकाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. महा आवास अभियान-ग्रामीण हे दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ५ जून, २०२१ दरम्यान राबविण्यात आले. या अभियानात आपला सक्रिय सहभाग मिळाला त्याबद्दल आपल्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन! असे असले तरी केंद्र शासनाच्या अहवालानुसार आपल्या राज्याचा घरकुल पूर्ण करण्याचा सरासरी कालावधी हा ३५७ दिवसांचा आहे. तसेच मंजूरी नंतर पहिला हप्ता वितरण करण्याचा सरासरी कालावधी ३७ दिवसांचा आहे. या तुलनेत देशातील इतर राज्यांच्या जसे की, उत्तरप्रदेश या राज्यामध्ये घरकुल पूर्ण करण्याचा कालावधी हा ११० दिवसांचा आहे. तर पहिला हप्ता वितरणाचा कालावधी हा ११ दिवसांचा आहे. याबाबत आपलेही नियोजन असावे असे वाटते. उत्तरप्रदेश मधील कालावधी कमी असल्याची कारणे पाहिली असता राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, ग्रामपंचायत स्तरापर्यंत संनियंत्रण यंत्रणा अधिक प्रबळ असल्याचे दिसून येते. अशाच प्रकारचे नियोजन आपल्या राज्यातही करण्याचे प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने महा आवास अभियान २.० आपण लवकरच सुरु करणार आहोत. मागील महा आवास अभियानामध्ये ज्या विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायती यांनी उत्कृष्ट काम केले आहे त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच अभियानातील विविध स्तरावरील पुरस्कार वितरण कार्यक्रम पार पडले व उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांचा गौरव करण्यात आला याबद्दल सर्वांचे अभिनंदन !

या कार्यक्रमाच्या माध्यमातून ज्या व्यक्ती व संस्थाचा गौरव करण्यात आला आहे त्यांच्या कामाची नोंद कायम स्वरुपी राहण्यासाठी **"गौरवगाथा"** पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

या शिवाय मागील जुलै, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या महिन्यामध्ये राज्यस्तरावर विविध बैठकांचे आयोजन करण्यात आले. या बैठकांमध्ये प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी , जिल्हा प्रोग्रामर, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या


माध्यमातून स्थानिक पातळीच्या समस्या व प्रगतीचा आढावा घेण्यात आला. याशिवाय राज्यस्तरावर दोन बैठकांचे नियोजन करण्यात आले. यामध्ये मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या उपस्थितीत अटल बांधकाम कामगार योजनेच्या मंजूरीच्या प्रक्रीयेत सुलभता आणण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत सकारात्मक परिणाम दिसून येतील अशी आशा आहे.

तसेच महा आवास अभियान अंतर्गत संनियंत्रण व मूल्यमापन समितीची बैठक घेण्यात आली. यामध्ये महा आवास अभियानाच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्यानुसार विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतींमध्ये उत्कृष्ट बहुमजली इमारती, उत्कृष्ट गृह संकुल पुरस्काराचे गुणांकन समिती पुढे ठेवून यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची माहिती समितीला देण्यात आली. तसेच महा आवास अभियान विशेष पुरस्काराची माहिती देण्यात आली. यामध्ये भूमीहिन लाभार्थ्यांना जागा देणे, मंजूरी देणे, घरकुले भौतिक दृष्टया पूर्ण करणे, बहुमजली इमारती, गृह संकुल, घरकुल मार्ट, कर्ज वितरण, मूलभूत नागरी सुविधा देणे, कॉर्पोरेट संस्था, स्वयं सेवी संस्थांचा सहभाग व इतर या विशेष उपक्रम राबविलेल्या जिल्हयांची माहिती मा. अध्यक्ष व इतर सदस्यांना देवून मंजूरी घेण्यात आली. या शिवाय जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, गट विकास अधिकारी यांच्या बैठकीचे वृत्तांकन सदर अंकात करण्यात आले आहे.

पुढील काळामध्ये आवास प्लसच्या प्रपत्र (ड) म्हणजेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत झालेल्या सन २०२१-२२ च्या उद्दिष्टाबाबत करावाच्या कार्यवाही बाबतची आदर्श कार्यपध्दती काय आहे याची सविस्तर माहिती सदरच्या अंकात देण्यात आली आहे. ही माहिती आपणास उपयुक्त ठरणार आहे. या शिवाय सदर अंकात विभाग निहाय यशोगाथा देण्यात आलेल्या आहेत.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षा निमित्त केंद्र शासनाने **आझादी का अमृत महोत्सव** कार्यक्रमाचे नियोजन केले व कार्यक्रम राबविण्याच्या स्वतंत्र अशा मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. याच धर्तीवर राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागानेही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव राबविण्याचे नियोजन केले आहे. यामध्येही आपला सक्रीय सहभाग असेल अशी आशा व्यक्त करतो.

अनेक शुभेच्छांसह!



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महा आवास अभियान पुरस्कार २०२० - २१

**'सर्वांसाठी घरे - २०२२'** या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी सन २०२०-२१ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यात आले आहे.

**"महा आवास अभियान-ग्रामीण"** अंतर्गत अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविण्याचे शासनाचे विचाराधीन होते. त्यानुषंगाने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि. १० जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** व **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** देऊन गौरव करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या अभियान कालावधी अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांच्या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार वितरीत करण्यात आले. शासन निर्णयामध्ये नमूद विविध स्तरावरील उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने पुढील समित्याव्दारे निवडण्यात आले.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

**"महा आवास अभियान-ग्रामीण"** मध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांमध्ये स्वतंत्रपणे उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तरावरील संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तर ग्रामपंचायत स्तरावरील विजेत्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

**"महा आवास अभियान-ग्रामीण"** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** म्हणून प्रदान करण्यात येणारे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह याचे डिझाईन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने केले असून सन्मानचिन्हाची निर्मिती व प्रशस्तीपत्राची छपाई त्या त्या स्तरावरुन करण्यात आली.

राज्यस्तरावर **"महा आवास अभियान-ग्रामीण"** मध्ये विविध ग्रामीण आवास योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येत आहे. तर अभियानातील विशिष्ट १० उपक्रमांना केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना ग्रामीण या योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थाना राज्यस्तरावरुन **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

पुरस्कार विजेत्यांना देण्यात येणारे सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी निधीची उपलब्धता राज्यस्तरावर आवश्यक त्या स्तरावर करण्यात आली आहे.



## 'महा आवास अभियान पुरस्कार' ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार निवडीसाठी दि. ०९ ते २० जून, २०२१ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दि. २१ जून, २०२१ रोजी अंतिम केली.

ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम ग्रामपंचायत स्तरावर माहे जून २०२१ महिन्यात संबंधित ग्रामपंचायतीचे मा. सरपंच यांचे शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. ग्राम पंचायत स्तरावर पुढील प्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

**सर्वोत्कृष्ट घरकुल** - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

### राज्य पुरस्कृत आवास योजना

**सर्वोत्कृष्ट घरकुल** - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक



## 'महा आवास अभियान पुरस्कार' तालुकास्तरीय पुरस्कार वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने तालुकास्तरीय पुरस्कार निवडीसाठी दि. २२ जून, २०२१ ते ०६ जुलै, २०२१ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दि. ०७ जुलै, २०२१ रोजी अंतिम केली.

तालुकास्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम तालुकास्तरावर माहे जुलै २०२१ या महिन्यात संबंधित तालुक्याचे मा. आमदार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी तालुकास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. तालुकास्तरावर पुढील प्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

१.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

### राज्य पुरस्कृत आवास योजना

१.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक




## 'महा आवास अभियान पुरस्कार' जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण

जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने जिल्हास्तरीय पुरस्कार निवडीसाठी दि. ०८ ते २२ जुलै, २०२१ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दि. २३ जुलै, २०२१ रोजी अंतिम केली.

जिल्हास्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ रोजी संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांचे शुभहस्ते जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जिल्हास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. जिल्हास्तरावर पुढील प्रमाणे 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरीत करण्यात आले.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

१.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्थांची शाखा - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

### राज्य पुरस्कृत आवास योजना

१.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्थांची शाखा - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक



## 'महा आवास अभियान पुरस्कार' विभागस्तरीय पुरस्कार वितरण

विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विभागस्तरीय पुरस्कार निवडीसाठी दि. २४ जुलै, २०२१ ते ०७ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दि. ०९ ऑगस्ट, २०२१ रोजी अंतिम केली.

विभागस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम विभागस्तरावर दिनांक १६ ऑगस्ट, २०२१ ते ३१ ऑगस्ट, २०२१ या कालावधित संबंधित विभागाचे विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी विभागस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. विभागस्तरावर पुढील प्रमाणे 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरीत करण्यात आले.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

१.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्थांची शाखा - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

५.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

### राज्य पुरस्कृत आवास योजना

१.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्थांची शाखा - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

५.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक




## 'महा आवास अभियान पुरस्कार' राज्यस्तरीय पुरस्कार वितरण

राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने राज्यस्तरीय पुरस्कार निवडीसाठी दि. १० ते २४ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दि. १३ सप्टेंबर, २०२१ रोजी अंतिम केली.

**'महा आवास अभियान पुरस्कार'** व **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** वितरण कार्यक्रम राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शुभहस्ते व मा. मंत्री ग्राम विकास, मा. राज्यमंत्री ग्राम विकास व महसूल व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात येत आहे. याप्रसंगी राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येईल.




## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून ग्रामीण गृहनिर्माण सबंधित भागधारकांचे क्षमता बांधणी प्रशिक्षण

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची गतिमानता कायम राखण्यासाठी योजना निहाय जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांचे सुक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने राज्य व्यवस्थापन कक्षाकडून बैठका, प्रशिक्षणे, क्षेत्रिय भेटी व इतर मार्गाने भागधारकांची क्षमता बांधणी करण्यात येते.

त्याचाच एक भाग म्हणून राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत दि. २४, २५, २६, २७ व ३० ऑगस्ट २०२१ रोजी अनुक्रमे कोकण, पुणे, अमरावती, नाशिक, नागपूर व औरंगाबाद विभागातील विभागीय प्रोग्रामर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील प्रकल्प संचालक, प्रोग्रामर, डेटा एन्ट्री ऑपरेटर, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्यासाठी दूरदृष्य प्रणालीव्दारे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणामध्ये आवास प्लस बाबत करावयाची कार्यवाही, महा आवास अभियान पुरस्कार नामांकन निवड व पुरस्कार वितरण, घरकुलांना मंजूरी, मंजूर घरकुलांना कमी कालावधीत प्रथम हप्ता वितरण, कमी कालावधीत घरकुले पूर्ण करणे याविषयी राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व समन्वयकांमार्फत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.




## राळेगाव पंचायत समिती येथे आवास प्लस डेटा बेस (प्रपत्र-ड) कार्यशाळा संपन्न

दिनांक २१ सप्टेंबर २०२१ रोजी पंचायत समिती सभागृह,राळेगाव येथे आवास प्लस डेटा बेस (प्रपत्र-ड) बाबत करावयाची आदर्श कार्यपध्दती/बाबत प्रशिक्षण/कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळा दोन टप्प्यात आयोजित करण्यात आली होती. सकाळी ११:३० वाजता धानोरा, वडकी, जळका तसेच दुपारच्या सत्रात १:००, वाजता वाढोना बा, वरध, झाडगाव या पंचायत समिती गणातील सर्व सरपंच, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते. सदर प्रशिक्षण/कार्यशाळेस मा.आमदार डॉ. प्रा. अशोकरावजी उईके, राळेगाव विधानसभा क्षेत्र व प्रकल्प संचालक, श्री. विनय ठमके जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यवतमाळ, विस्तार अधिकारी (सां) श्री. प्रभाकर पांडे, श्री. पाटील, तसेच राळेगाव तालुक्यातील पंचायत समितीचे मा. सभापती, मा.उपसभापती, मा.जि.प.सदस्य, मा. पं. स.सदस्य, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. रविकांत पवार तसेच राळेगाव तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, पर्यवेक्षक, पं.स. मधील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, आपले सेवा सरकार केंद्राचे तालुका व्यवस्थापक, पंचायत समितीचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

सदर प्रशिक्षणादरम्यान प्रकल्प संचालक, श्री. विनय ठमके , श्री.प्रभाकर पांडे यांनी "आवास प्लस डेटा बेस (प्रपत्र-ड) बद्दल आधार सिडिंग व जॉबकार्ड मॅपिंग करीता ऑनलाईन उपलब्ध झालेल्या यादीवर प्रसिद्धी करणेपासून व ग्रामसभा पुर्व तसेच ग्रामसभेनंतर करावयाच्या सर्व आदर्श कार्यपद्धती, तसेच तालुकास्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती यांची रचना/आक्षेप कालावधी/ कार्यकक्षा याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.





# आवास प्लस डेटाबेस (प्रपत्र-ड) ची कायम स्वरूपी प्रतिक्षा यादी (PWL) तयार करण्याच्या आदर्श कार्यपध्दती बाबत.

आवास प्लस सर्वेक्षण (प्रपत्र-ड) मधील माहितीच्या आधारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची प्राधान्यक्रम यादी तयार करण्याबाबत केंद्र शासनाने पत्र क्र.No.M-१२०१८/०२/२०१९-RH(M&T)-Part(१), दि.१५/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आवास प्लस सर्वेक्षणची माहिती वापरुन प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण करिता लाभार्थ्यांच्या प्राधान्यक्रम याद्या तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत-

### १. उद्दिष्ट वाटपाची प्रक्रिया

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत उद्दिष्ट वितरीत करण्यासाठी डॉ.नागेश सिंह, माजी अतिरिक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली **Expert Committee** गठीत करण्यात आली होती. सदर कमिटीमध्ये सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (MoSPI), राष्ट्रीय रिमोट सेन्सिंग एजन्सी (NRSA), राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), डेटा विश्लेषणासाठी केंद्र (भाग विश्लेषकांचा समावेश असलेली तज्ञ समिती) CEDA, MoRD आणि इतर यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत स्तरावर उद्दिष्ट हे ग्रामपंचयतीने निर्माण केलेल्या मनरेगा मनुष्य दिवसांच्या प्रमाणात वाटप केले आहे. अनेक राज्यांनी उद्दिष्ट वितरणासाठी एकमेव सूचक म्हणून मनरेगा मनुष्य दिवसांच्या (ManDays) वापरासंबंधी आक्षेप व्यक्त केला म्हणून, श्री प्रवीण श्रीवास्तव, माजी सचिव, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अध्यक्षतेखाली एक नवीन तज्ञ समिती तयार केली गेली या समितीच्या शिफारशीनुसार-

१) गेल्या तीन वर्षात मनरेगा अंतर्गत रोजगार निर्माण केलेले मनुष्य दिवस.

२) SC/ST लोकसंख्येची टक्केवारी.

३) SECC Deprivation Score (वंचित) गुण.

या बाबीच्या आधारे व त्यानंतर त्या ग्रामपंचायत मधील एकूण ग्रामीण कुटुंबांना पात्र आवास प्लस नोंदणीच्या प्रमाणात हे गुणाकार करून उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. AwaSoft पोर्टलवर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनानुसार उद्दिष्ट वाटप होताना एकूण उद्दिष्टाच्या किमान ६०% अनुसूचित जाती/जमातींना वाटप केले जाईल आणि उर्वरित ४०% इतर संवर्ग आणि अल्पसंख्यांक संवर्ग यांना वाटप केले जाईल, जे अल्पसंख्यांक संवर्गासाठी जास्तीत जास्त १५% वाटप असेल. अपात्र लाभार्थ्यांच्या रिमांड प्रक्रियेनंतर जे उद्दिष्ट शिल्लक राहील अशा उद्दिष्टाबाबत समायोजन (Reshuffle) करण्याची प्रक्रिया राज्यस्तरावरुन करण्यात येईल. यासाठी संपूर्ण राज्यातील आवास प्लस आधार सिडींग होणे आवश्यक आहे.

### २. पूर्व-प्राधान्य यादी/पात्रता निकष

पूर्व-प्राधान्य यादी/पात्रता निकष प्राधान्य यादी तयार करण्यापूर्वी, आवास सॉफ्ट प्रणालीमार्फत **SECC-२०११** चे वगळण्याचे निकष (Automatic Exclusion Criteria) व समाविष्ट करण्याचे निकष (Automatic Inclusion Criteria) पात्र लाभार्थीची यादी वेगळी केली आहे. आवास सॉफ्ट प्रणालीद्वारे सर्वेमधील आधार सिडींग डेटाचा उपयोग करुन **डी-डुप्लीकेशन** प्रक्रिया पूर्ण केली आहे.

### ३. प्रधान्यक्रम ठरविण्याची प्रक्रिया

श्री. नागेंद सिंह कमिटीच्या शिफारशीनुसार खालील तीन बाबींवरुन आवास प्लस (प्रपत्र-ड) डेटाची प्राधान्यक्रम यादी ठरविण्यात आली आहे.

१. कुटुंबातील व्यक्तींची संख्या (Family Size).

२. कुटुंबातील जास्तीत जास्त वय असणारी व्यक्ती (Maximum Age in Family).

३. मरनेगा अंतर्गत मनुष्य दिवस निर्मिती (Man-days Worked under MGNREGA).

प्रत्येक संवर्गातील याद्या तयार करताना बेघर, शून्य, एक आणि दोन खोल्या असा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे.

पात्र लाभार्थ्यांच्या यादी मधील लाभार्थ्यांचे गुण समान असतील तर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचना मधील SECC Data च्या आधारे Deprivation Score नुसार त्या लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे (Tie breaker).

१. १६ ते ५९ वयोगटातील प्रौढ सदस्य नसलेली कुटुंबे,

२. या कुटुंबात महिला कुटुंब प्रमुख आहे व १६ ते ५९ वयोगटातील पुरुष नसलेली कुटुंब.

३. २५ वर्षापेक्षा जास्त वयोगटातील साक्षर नसलेले कुटुंब

४. या कुटुंबात अपंग सदस्य आहे व शरीराने सक्षम प्रौढ सदस्य नसलेले कुटुंब.

५. भूमिहीन कुटुंब व त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग मजूरी आहे.

### ४. प्रधान्यक्रम यादी अंतिम करण्याची प्रक्रिया

a. आवास प्लस डेटाबेस मधील कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करुन अपात्र कुटुंबे वगळण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी (आपल्या स्तरावरुन समिती गठीत करुन कार्यवाही करणे) (Removal of Ineligible Beneficiaries).

b. तालुकास्तरावरुन अपात्र ठरविलेल्या लाभार्थ्यांना आवास सॉफ्ट प्रणालीवर जिल्हास्तरावरुन मान्यता देणे.

c. या ग्रामपंचायती मध्ये अपात्र लाभार्थी वगळण्याची प्रक्रिया (Removal Process) पूर्ण झाली आहे, अशा ग्रामपंचायतीला आवास सॉफ्ट प्रणालीवर जिल्हास्तरावरु मार्क करणे.

d. या ग्रामपंचायती मध्ये जॉब कार्ड मॅपिंग १०० टक्के पूर्ण झाले आहे. फक्त अशाच ग्रामपंचायतीच्या प्राधान्यक्रम याद्या आवास सॉफ्ट प्रणालीवर उपलब्ध होतील.

e. ग्रामपंचायत निहाय प्राधान्यक्रम याद्या ग्रामसभे मध्ये ठेवण्यासाठी डाऊनलोड करण्यात येतील.

f. भविष्यात Download करण्यात आलेल्या System Generated Priority List यादीवर कोणत्याही प्रकारचा आक्षेप येवू नये यासाठी Download केलेल्या याद्यांना व्यापक प्रसिध्दी द्यावी. (ग्रामपंचायतीच्या दर्शनीय भागावर याद्या लावणे, इलेक्ट्रॉनिक मिडीयाचा वापर, दवंडी इत्यादी), तसेच सर्व ग्रामसभेच्या सभासदापर्यंत सदर यादी पोहचेल, अशी दक्षता सरपंच व सचिव यांनी घ्यावी.

g. वरील सर्व याद्या ग्रामसभेत किंवा आवश्यक असल्यास विशेष ग्रामसभेत ठेवाव्यात.

h. इतर संवर्गाच्या यादीमधील अल्पसंख्यांक लाभार्थी वेगळे करणे.

I. ग्रामसभेमध्ये ठेवलेल्या यादीची अ, ब, क अशा याद्या तयार करण्यात येतील.

j. ग्रामसभा ठराव व अधिकाऱ्यांचे पडताळणी अहवाल आवास सॉप्ट प्रणालीवर अपलोड केल्या जातील.

k. तालुकास्तरावर आवास सॉप्ट प्रणालीवर ग्रामसभेने अंतिम केलेली प्राधान्यक्रम यादी (प्रपत्र-ब) ची नोंदणी करण्यात येईल.

l. अंतिम केलेल्या प्राधान्यक्रम यादीला जिल्हास्तरावरील **Appellate Committee** ची मान्यता मिळाल्यानंतर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मंजूरीसाठी पात्र होईल.

वरीलप्रमाणे अ, ब व क विषयावरील ग्रामसभेच्या ठरावाद्वारे मंजूर झालेल्या याद्यांना ग्रामसभा झालेल्या तारखेपासून ७ दिवस प्रसिध्दी द्यावी. यादी प्रसिध्द केल्यानंतर विषय अ, ब व क च्या यादी संदर्भातील प्राधान्यक्रम बदल, वगळणे इत्यादी संदर्भात हरकती असल्यास संबंधित कुटुंबांची यादी प्रसिध्दीची मुदत संपल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत संबंधित तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करु शकतील.

### ५. अपील समिती

कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी तयार करतांना होणाऱ्या तक्रारीं / सूचनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अपील समिती गठीत करण्यात येत आहे.

#### I. तालुकास्तरीय समिती

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती - अध्यक्ष

२. नायब तहसिलदार - (तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेला)

३. शाखा अभियंता - (उप अभियंता यांनी वरिष्ठतम पैकी प्राधिकृत)

४. विस्तार अधिकारी - (सांख्यिकी) - सदस्य सचिव.

#### कार्यकक्षा

१. प्रस्ताव सक्षम व्यक्तीद्वारे उदा. ग्रामसेवक/ शाखा अभियंता/ तलाठी यांचेकडून स्थळ पहाणी करुन घेणे.

२. प्रस्तावाची छानणी / पडताळणी करणे.

३. प्राप्त प्रस्ताव पात्र - अपात्र अभिप्रायासह जिल्हास्तरीय समितीकडे योग्य कार्यवाहीस्तव पाठविणे.

#### II. जिल्हास्तरीय अपिल समिती

१. अध्यक्ष - मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी

२. सदस्य - प्रकल्प संचालक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेशी चर्चा करुन अशासकीय सदस्य निवड करावी.

३. सदस्य सचिव - प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.

#### कार्यकक्षा

१. तालुकास्तरीय समितीला मार्गदर्शन करणे, कामाचा आढावा घेणे.

२. तालुकास्तरीय समितीकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावावर पात्र/ अपात्र बाबत अंतिम निर्णय देणे.

ग्रामसंभेच्या वरील अ, ब व क विषयावरील ठरावाच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारीवर तालुकास्तरावर समितीचा अहवाल व MIS AwaasSoft वरील संवर्गनिहाय Generated Priority List मधील सर्व कुटुंबाची घर निकषाबाबत तालुकास्तरीय समितीचा चौकशी अहवालाच्या आधारे जिल्हास्तर अपीलीय समिती १० दिवसात आपला अंतिम निर्णय देतील.

वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाच्या आधारे जिल्हास्तर समिती ग्रामपंचायतींची संवर्गनिहाय अंतिम प्राधान्यक्रम यादी प्रसिध्द करतील. सदर याद्या ग्रामपंचायत सूचना फलकावर व प्रमुख ठिकाणी लावावी व पुरेशी प्रसिध्दी द्यावी. सदर अंतिम संवर्गनिहाय, प्राधान्यक्रम यादी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या आवास सॉफ्ट प्रणालीवर गट विकास अधिकारी यांनी तालुकास्तरावरुन तात्काळ upload करावी.

याबाबत कार्यवाही करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण केंद्र शासनाच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना व संदर्भाधीन पत्रामधील सूचना विचारात घेण्यात याव्यात. तरी उपरोक्त नमुद प्रक्रियेद्वारे आवास प्लस (प्रपत्र-ड) मधील लाभार्थ्यांची कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) आपल्या स्तरावरुन दि. १५ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत तयार करण्यात यावी.

## प्रपत्र-अ

**विषय :-** ग्रामसभेने Generated Priority List मधील इतर संवर्गातून अल्पसंख्याक संवर्गातील (जैन, बौध्द, ख्रिश्चन, शीख व मुस्लिम) कुटुंबांची यादी वेगळी करुन तयार व अल्पसंख्यांक संवर्गाची स्वतंत्र यादी मूळ प्राधान्यक्रम यादीतील प्राधान्यक्रम अबाधित ठेऊन तयार करणे.

**ठराव क्र. ....** ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने इतर संवर्गाची व अल्पसंख्यांक संवर्गाची लाभार्थीनिहाय यादी खालीलप्रमाणे मंजूरी देणेत येत आहे.

**जिल्हा ......................**

**पंचायत समिती :- ........... ग्रामपंचायत :- ...........**

**संवर्ग - इतर/अल्पसंख्यांक**

| अ.क्र. | आवास प्लस ID | कुटुंब प्रमुख लाभार्थ्यांचे नाव | Generated Priority प्रमाणे संवर्ग | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामसभेद्वारे शिफारस करणेत आलेला संवर्ग |
|---|---|---|---|---|

**(स्वाक्षरी) (स्वाक्षरी) (स्वाक्षरी)**

**सरपंच ग्रामसेवक विस्तार अधिकारी/ ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी**

## प्रपत्र-ब

**विषय :-** संवर्गनिहाय (अ.जा, अ.ज, अल्पसंख्याक व इतर) प्राधान्यक्रम यादीमधून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनेसाठी पात्र कुटुंबांची प्राधान्यक्रम यादी तयार करणे.

**ठराव क्र. ........** ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने यादीमधून प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र कुटुंबाची/ लाभार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे मंजूरी देणेत येत आहे.

**जिल्हा ......................**

**पंचायत समिती :- ........... ग्रामपंचायत :- ...........**

**संवर्ग - अ.जा., अ.ज., इतर/अल्पसंख्यांक**

| अ.क्र. | आवास प्लस ID | ग्रामपंचायतीचे नाव | कुटुंब प्रमुख लाभार्थ्यांचे नाव | Generated Priority प्रमाणे संवर्ग | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामसभेद्वारे लाभ देणेसाठी ग्रामसभेचा निर्णय (पात्र) |
|---|---|---|---|---|---|

**(स्वाक्षरी) (स्वाक्षरी) (स्वाक्षरी)**

**सरपंच ग्रामसेवक विस्तार अधिकारी/ ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी**

## प्रपत्र-क

**विषय :-** संवर्गनिहाय (अ.जा, अ.ज, अल्पसंख्याक व इतर) प्राधान्यक्रम यादीमधून अपात्र कुटुंबांची नावे वगळून व त्यांची कारणे नमूद करुन संवर्गनिहाय स्वतंत्र याद्या तयार करणे.

**ठराव क्र. .....** ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने यादीमधून संवर्गनिहाय अपात्र कुटुंबाची/ लाभार्थ्यांची यादीसाठी खालीलप्रमाणे मंजूरी देणेत येत आहे.

**जिल्हा ......................**

**पंचायत समिती :- ........... ग्रामपंचायत :- ...........**

**संवर्ग - इतर / अल्पसंख्यांक**

| अ.क्र. | आवास प्लस ID | ग्रामपंचायतीचे नाव | कुटुंब प्रमुख लाभार्थ्यांचे नाव | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ न देणेसाठी नमूद करावयाची कारणे (उदा. यादीत चूकीने समाविष्ट, मयत, पक्के घर, स्थलांतरीत इ.) |
|---|---|---|---|---|

**(स्वाक्षरी) (स्वाक्षरी) (स्वाक्षरी)**

**सरपंच ग्रामसेवक विस्तार अधिकारी/ ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी**

## मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांच्या विविध घरकुल योजनांबाबत आढावा बैठक

मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याकरीता बैठक घेण्यात आली. या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग, मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांच्यासह ग्रामविकास विभाग, कामगार विभाग व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये जिल्हास्तरीय समिती व लाभार्थी निवड यामध्ये सुधारणा करणे. पुरूष नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांना वडीलांनी अथवा महिला बांधकाम कामगार लाभार्थ्यांना सासू/सासरे यांनी मुलाला/सुनेला त्यांच्या नावावरील जुनी कच्ची घरे अथवा जागा पक्के घरे बांधण्यासाठी संमतीपत्र देणे. घरकुल बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास बहुमजली इमारती व कामगारांच्या वसाहती उभारणे. बहुमजली इमारती/बांधकाम कामगार वसाहती अर्थसहाय्य वितरण टप्पे प्रमाणित करण्यासाठी नोंदणीकृत वास्तुविशारदाची नियुक्ती करणे. अटल बांधकाम कामगार आवास योजनेतील घरांची रचना निश्चित करण्यात यावी. त्याचप्रमाणे घरकुलाबाबत अर्ज करण्याची पध्दती, प्राप्त अर्ज छाननी व अर्थसहाय्य देण्याची कार्यपद्धती या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजना विषयी सादरीकरण केले. त्याचप्रमाणे अटल बांधकाम कामगार आवास योजनेमध्ये सध्या सुरू असलेल्या कार्यवाही बाबत उपस्थितांना अवगत केले.



## पालघर जिल्ह्यातील 'आशियाना' प्रकल्प म्हणजे सर्व नागरी सुविधायुक्त आदर्श घरकुल

**- डॉ. राजाराम दिघे, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई**

महाराष्ट्र राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांनी दिनांक २०/०९/२०२१ रोजी पालघर जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान डॉ. राजाराम दिघे यांनी वाडा तालुक्यातील 'आशियाना' प्रकल्पा अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांची पहाणी केली.

या दौऱ्यात त्यांनी जिल्हा परिषद पालघर येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, श्री. माणिक दिवे यांच्या उपस्थितीत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. या बैठकीला पालघर जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण सबंधित सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. राजाराम दिघे यांनी श्री. माणिक दिवे यांच्यासह पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील 'महा आवास अभियान-ग्रामीण' दरम्यान डाहे व गातेस ग्रामपंचायती मधील रोटरी जिल्हा ३१४१ अंतर्गत "आशियाना" प्रकल्पातून मुलभूत सुविधांद्वारे बांधलेल्या






आदर्श घरकुलांना भेट दिली. यावेळी रोटरी जिल्हा ३१४१ चे सदस्य श्री. राज खोसला, पंचायत समिती वाडाच्या विस्तार अधिकारी श्रीमती अपर्णा पाटील, ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. घरकुलांच्या पहाणी नंतर डॉ. राजाराम दिघे यांनी आशियाना प्रकल्पात उभारण्यात आलेली सर्व घरकुले सर्व नागरी सुविधायुक्त आदर्श घरकुले असल्याचे सांगितले. तसेच अशा घरकुलांची निर्मिती इतर जिल्ह्यात करण्याचे आवाहन रोटरी जिल्हा सदस्यांना केले.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांनी वाडा तालुक्यासह पालघर तालुक्यातील केळवा व माहीम ग्रामपंचायत मधील घरकुलांची पाहणी केली.



## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून महा आवास अभियान पुरस्कार निवडीसाठी गृहनिर्माण योजनांच्या कामाची तपासणी

राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. या अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात अधिक गतिमानता व गुणवत्ता आली आहे. अभियानाच्या यशस्वतेसाठी सर्व स्तरावरून सक्रीय सहभाग नोंदविण्यात आला.

ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात आले. येत्या कालावधीत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विभागातून पुरस्कारासाठी निवड केलेल्या सर्वोत्कृष्ट संस्था व व्यक्ती बाबतचा अहवाल राज्यस्तरावर सादर करण्यात आला. प्राप्त अहवालाच्या आधारे राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती प्रत्यक्ष भेटी देवून तसेच संख्यात्मक प्रगतीच्या आधारे राज्यस्तरीय पुरस्कार नामांकनाची अंतिम निवड करणार आहे. त्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांनी विभागस्तरीय प्राप्त अहवालाच्या आधारे कामाची तपासणी करण्याचे आदेश राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत नेमण्यात आलेल्या विभागीय संपर्क अधिकारी यांना दिले.

त्यानुसार माहे सप्टेंबर २०२१ या महिन्यात राज्य व्यवस्थापन कक्षातील श्री. नीलेश काळे (उपसंचालक) यांनी नागपूर विभाग, श्री. संतोष भांड यांनी पुणे विभाग, संजय घोगळे यांनी कोकण विभाग, श्री. संतोष पानसरे यांनी नाशिक विभाग व श्री. राम आघाव यांनी अमरावती व औरंगाबाद विभाग मधील ग्रामपंचायतींना क्षेत्रिय भेटी देवून प्रत्यक्षात कामांची तपासणी केली.

या तपासणी दरम्यान विभागीय संपर्क अधिकारी यांनी विभागस्तरीय समितीकडील प्राप्त अहवालनुसार बहुमजली इमारती व गृह संकुलांना भेटी देवून कामाची तपासणी केली. सर्व राज्यस्तरीय अधिकारी यांनी त्यांचे तपासणी अहवाल राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांच्याकडे सादर केले.

राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व





मूल्यमापन समितीचे सदस्य सचिव, डॉ. राजाराम दिघे यांनी राज्यस्तरीय अधिकारी यांनी केलेल्या तपासणी अहवालाच्या आधारे मूल्यांकन करून 'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार' व 'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार' नामांकन निवडी बाबतचे अहवाल तयार करून राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीकडे अंतिम मान्यतेसाठी सादर केले.







## महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या विभागनिहाय आढावा बैठका

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात आलेली गतिमानता व गुणवत्तेत सातत्य राखण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत माहे जुलै २०२१, ऑगस्ट २०२१ व सप्टेंबर २०२१ मध्ये अमरावती, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण विभागांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, डाटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये तालुक्यातील मनरेगा ऑपरेटर व घरकुल योजनेचा ऑपरेटर यांच्यामध्ये समन्वयाच्या अभावामुळे लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेत वितरीत होण्यास विलंब होत आहे. ग्रामसेवक/लाभार्थी/ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्याकडून प्रस्ताव/दस्ताऐवत वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे मंजूरीच्या प्रक्रियेला विलंब होत आहे. भौतिकदृष्टया पुर्ण असलेली परंतु मनरेगा अंतर्गत सर्व मस्टरचा लाभ न मिळालेल्या घरकुलांना शेवटचा हप्ता वितरीत होताना दिसून येत नाही. त्यामुळे अशी घरकुले आवाससॉफ्टवर अपुर्ण दिसून येत आहे. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा होताना दिसून येत नाही. तालुक्यातील अपुर्ण घरकुलांची विगतवारी लाभार्थीनिहाय करणे आवश्यक आहे. त्यासाठी लाभार्थीनिहाय पाठपुरावा करणे आवश्यक आहे. घरकुले आर्थिक व भौतिकदृष्टया विहित वेळेत पुर्ण होणेसाठी सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे. पहिला हप्ता घेऊन १२ महिन्यापेक्षा अधिक कालावधी झालेली प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आवासप्लस मधील जॉब कार्ड मॅपिंगचे काम विहित वेळेत पुर्ण होण्यासाठी पाठपुरावा आवश्यक आहे. कायमस्वरूपी प्रतिक्षा यादीतील अपात्र लाभार्थ्यांची आवाससॉफ्टवर रिमांड प्रक्रिया वेळेत पुर्ण करावी. भूमिहीन लाभार्थ्यांची व विविध योजनांच्या कृतीसंगमाचा लाभ दिल्याची माहिती आवाससॉफ्टवर नोंदवावी. इच्छुक नाही, जागा वाद, करारनामा अप्राप्त, मयत लाभार्थी, अकाउंट व्हेरिफिकेशन, राज्य योजनेतील बदली प्रस्ताव याबाबत ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी नेमून लाभार्थी निहाय पडताळणी करावी. अशा सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना दिल्या.



## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या साप्ताहिक आढावा बैठका

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाचा आढावा घेण्याकरीता माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०२१ या महिन्यामध्ये दर सोमवारी साप्ताहिक आढावा बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकांना राज्य व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण पूर्व तयारी, महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ शासन निर्णय मसूदा तयार करणे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्या मानधनाबाबत शासन निर्णय मसूदा तयार करणे, राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती बैठकीची पूर्व तयारी, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता याकरीता टास्क फोर्स स्थापना शासन निर्णय, आवास प्लस सर्वेक्षण (प्रपत्र-ड) मधील माहितीच्या आधारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची प्राधान्यक्रम यादी तयार करणे व कार्यालयीन पत्रव्यवहार विषयी आढावा घेण्यात आला.

तसेच राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण सभारंभासाठी गौरवगाथा पुस्तक, IEC साहित्य, हॉल बुकींग व समारंभासाठी उपस्थितांना निमंत्रण याबाबत चर्चा करण्यात आली.



## घरकुल मंजूरी, घरकुलांना निधी वितरण व घरकुल बांधकाम तात्काळ पूर्ण करावे

**- प्रतिभा संगमनेरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे**

दिनांक २३/०९/२०२१ रोजी दुपारी ३ वाजता धुळे जिल्ह्याच्या प्रकल्प संचालक, श्रीमती प्रतिभा संगमनेरे यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, धुळे येथे जिल्ह्यातील कनिष्ठ सहाय्यक, सागर मोगल, जिल्हा प्रोग्रामर हर्षल माळी, जिल्हा डेटा एन्ट्री ऑपरेटर, अमोल माळी, खगेश दंडगव्हाळ यांच्यासह सर्व विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती घरकुल कक्षातील संकलन सहाय्यक, जिल्हा व तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला.

या आढावा बैठकीमध्ये घरकुलांना मंजूरी, मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण, घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार निधीचे हप्ते वितरण, अपूर्ण घरकुले पूर्ण करणे याबाबत दिनांक ३०/०९/२०२१ च्या आत कार्यवाही करण्याच्या सूचना बैठकीला उपस्थितांना दिल्या. सर्व विस्तार अधिकारी यांना भागनिहाय लाभार्थ्यांच्या याद्या देऊन त्यांना ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांमार्फत उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याबाबत नियोजन करून त्यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामपंचायत जैताणे, ता.साक्री येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वान्मथी सी. यांच्या मार्गदर्शनाखाली गृह संकुलाचे काम गवंडी प्रशिक्षण अंतर्गत सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी ५४ घरांचे गृह संकुल निर्माण होणार आहे. या बैठकीमध्ये श्रीमती प्रतिभा संगमनेरे यांनी या गृह संकुलाचा बांधकामाच्या प्रगती बाबत आढावा घेतला असून यामध्ये ९ घरकुल प्लिंथ लेव्हल, ९ घरकुल लिंटेल लेव्हल आणि ९ फॉऊंडेशन लेव्हलला असल्याचे सांगण्यात आले. तसेच उर्वरित घरकुलांचे बांधकाम लवकरच सुरू करणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी श्रीमती प्रतिभा संगमनेरे यांनी पंचायत समिती साक्रीचे गट विकास अधिकारी, श्री जगन सूर्यवंशी यांच्यासह ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक व सरपंच यांनी स्वतः लक्ष देवून गृह संकुलाचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याचे सांगितले.



## नांदेड जिल्हात पहिला हप्ता घेवून घरकुलाचे काम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांसाठी लोक अदालतीचे आयोजन

गरिब, गरजू, बेघर व भूमिहीनांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे याकरीता केंद्र व राज्य शासनाकडून विविध ग्रामीण आवास योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना इ. योजनांचा समावेश आहे.

लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाल्यानंतर घरकुल बांधकामासाठी पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात येते. परंतु काही लाभार्थी पहिला हप्ता मिळाल्यानंतरही घरकुल बांधकामास सुरूवात करीत नाही. पहिला हप्ता मिळाल्या पासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटुनही घरकुल बांधकाम सुरू न करणाऱ्या लाभार्थ्यांचा समावेश प्रलंबित घरकुलांच्या यादीत करण्यात येतो. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लाभार्थी मेळावे, गृह भेटी, लाभार्थ्यांशी वेळोवेळी बैठका व जनजागृती इ. उपाय योजना शासन स्तरावरून करण्यात येतात.

प्रलंबित घरकुले पूर्ण करण्याकरीता नांदेड जिल्हात एका अभिनव उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती मुदखेड, कंधार, हिमायतनगर मध्ये दिनांक ०१/०८/२०२१ रोजी मंजूर घरकुलांना पहिला हप्ता वितरीत करून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही घरकुलाचे बांधकाम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांसाठी तालुकास्तरीय न्यायालयात लोक आदालतीचे आयोजन करण्यात आले. यामुळे लाभार्थ्यांनी प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यास सुरूवात केली आहे.







## महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत कागल तालुक्यात आदर्श घरांची निर्मिती

- श्रीमती जगताप, सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्तालय, पुणे

दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी सहाय्यक आयुक्त (विकास), पुणे विभागीय आयुक्तालय, श्रीमती जगताप व पुणे आयुक्तालयाचे श्री. बोंबले यांनी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत झालेल्या कामाची पाहणी करण्याकरीता कागल तालुक्याचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्रीमती जगताप व श्री. बोंबले यांनी पंचायत समिती कागल येथे तालुक्यातील सर्व ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा सर्व ग्रामीण आवास योजना बाबत आढावा घेतला. त्यानंतर कागल पंचायत समिती आवारातील पर्यावरण पूरक टाकाऊ प्लास्टिक बॉटल्सचा वापर करून बांधण्यात आलेल्या डेमो हाऊसला भेट दिली. त्याचप्रमाणे कागल तालुक्यातील काही ग्रामपंचायतींना भेटी देवून घरकुलांची पहाणी केली. यावेळी श्रीमती जगताप यांनी कागल तालुक्यातील गावांमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत आदर्श घरांची निर्मिती केली असून अभियान कालावधीत कागल तालुक्याने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली असल्याचे सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री. वाघमारे, विस्तार अधिकारी सांख्यिकी, श्री. कानडे , ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, श्री. वास्कर व डेटा एन्ट्री ऑपरेटर, श्री.कांबळे उपस्थित होते.



# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत परभणी व बीड जिल्ह्यात ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचे आयोजन व प्रशिक्षणार्थींचा सत्कार

यावर्षी आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. या निमित्ताने केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध पातळीवर साजरा करण्यात येत आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दिनांक १२ मार्च २०२१ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान, मुंबई येथून याचा शुभारंभ करण्यात आला आहे.

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संकल्पनेचा उद्देश :-**

१. भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने **'आझादी का अमृत महोत्सव'** मधील उपक्रमाचे राज्यात आयोजन करणे.

२. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ७५ वर्षात राज्यात घडलेल्या महत्वाच्या घडामोडींना उजाळा देण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

३. ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध लोक कल्याणकारी योजनांमध्ये गतीमानता व गुणवत्ता आणून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

४. ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- पंचायत राज संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. चा सक्रीय सहभाग घेणे.

५. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात राज्यात ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या योजनांतर्गत सर्व भागधारकांची क्षमताबांधणी करून जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्याच्या सुचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण यांनी संबंधितांना दिल्या.

I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सामाजिक व आर्थिक जात सर्वेक्षण २०११ च्या आधारे तयार केलेल्या कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधील व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील **भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देऊन घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे.**

ii. आवास प्लस ('ड' यादी) मधील कुटूंबांचे १००% आधारसिडिंग, १००% जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करुन विशेष ग्राम सभांद्वारे **प्राधान्यक्रम यादी (Priority List) तयार करणे** व वर्ष निहाय उद्दिष्टानुसार **मंजूरी देऊन घरकुले पूर्ण करणे.**

iii. राज्यातील **ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये गुणवत्ता आणण्याच्या दृष्टीकोनातून आधुनिक बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक गृहनिर्माण तंत्रज्ञान, स्थानिक पातळीवर उपलब्ध पारंपारीक बांधकाम साधन सामुग्रीचा वापर,** इत्यादींचा विचार करून **नवनवीन संकल्पना राबविणे.**

iv. राज्याचे ग्रामीण गृहनिर्माण धोरण विकसीत करणे.

v. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी **'महा आवास अभियान-ग्रामीण' अधिक प्रभावीपणे राबवून उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देणे.**

दि. २९/०९/२०२१ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत टाकळी कुंभकर्ण येथे गवंडी प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षित गवंडी व लाभार्थी यांचा सत्कार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक, श्रीमती रश्मी खांडेकर यांचे हस्ते करण्यात आला. तसेच आष्टी येथील ग्रामपंचायत कनेरवाडी येथे गवंडी प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणार्थी गवंडी यांची परीक्षा घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच, लाभार्थी व प्रशिक्षण संस्थेचे समन्वयक उपस्थित होते.






## मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल यांच्या शुभहस्ते लोणी बु. येथे तालुकास्तरीय महा आवास अभियान पुरस्काराचे वितरण व गृह संकुलास भेट

दिनांक ०७/०९/२०२१ रोजी मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांनी राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून पुरेशी जागा उपलब्ध असल्यास ग्रामपंचायत लोणी बु., ता. राहाता, जि. अहमदनगर येथे उभारण्यात आलेल्या सिंधुताई आदिवासी निवारा गृह संकुलास भेट दिली.

लोणी बु. ग्रामपंचायतील भेटी दरम्यान मा.राज्यमंत्री ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांच्या शुभहस्ते व मा. आमदार, राहाता तालुका, श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे ग्रामपंचायतस्तरावरील घरकुल लाभार्थी व इतर संस्था यांना तालुकास्तरीय पुरस्कार वितरीत करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती राहाता, सभापती श्रीमती नंदाताई तांबे, उपसभापती मा. श्री. ओमेश जपे, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री. समर्थ शेवाळे, श्री. गायकवाड (विस्तार अधिकारी), सरपंच, ग्रामसेवक व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सिंधुताई आदिवासी निवारा गृह संकुलाची उभारणी करण्याकरीता जिल्हा परिषद सेस रक्कम रू.४९५७/-, पंडीत दीनदयाळ योजने अंतर्गत घरकुल वसाहतीकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणेसाठी रक्कम रू. ४५ लाख व भूमिगत पाईपलाईन गटारीसाठी रक्कम रू. ५ लाख रुपये असा एकुण अदांजे रक्कम रू. ५० लाख रुपये निधीची उपलब्धता करण्यात आली आहे.

सिंधुताई आदिवासी निवारा गृह संकुलामध्ये १० घरकुलांचे एक गृह संकुल असे एकाच ठिकाणी ६ गृह संकुल म्हणजे ६० घरकुलांची उभारणी करण्यात आली आहे. या गृह संकुलांमध्ये एकुण ५७ लाभार्थी व ३०० लोकसंख्या वास्तव्यास आहे. सिंधूताई आदिवासी निवारा हे गृह संकुल उभारतांना सर्व लाभार्थ्यांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. जसे भूमिगत गटार, सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी सर्व घरांमध्ये नळ कनेक्शन, पथ दिवे, वीज जोडणी, पिण्याच्या पाण्याच्या ५०० लिटर टाक्या, प्लंबिंग सह घरात पाण्याचे नळ, साडंपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गृह संकुलात इलेक्ट्रीफीकेशन करण्यात आले आहे. सोलरवर चालणारा बोरवेल व भविष्यात लाभार्थ्यांना घराचे काम करण्यासाठी चाल (मार्ग) काढून देण्यात आली आहे.

मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार यांनी वेळात वेळ काढून ग्रामपंचायतीला भेट दिली व तालुकास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरीत केले, त्याबद्दल गट विकास अधिकारी श्री. शेवाळे यांनी आभार मानले.






## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह डिझाईन

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यात आले. अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविण्याचे शासनाचे विचाराधीन होते. त्यानुषंगाने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि. १० जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** व **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** देऊन गौरव करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

त्यानुसार राज्यात माहे जुन ते सप्टेंबर २०२१ या कालावधीत ग्रामपंचायतस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तरावर अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना **'महा आवास अभियान पुरस्कार'** देवून गौरविण्यात आले. पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह याचे डिझाईन राज्य व्यवस्थापन कार्यालयाकडून देण्यात आले. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह याची छपाई त्या त्या स्तरावरून करण्यात आली. त्याकरीता आवश्यक निधीची उपलब्धता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून संबंधित कार्यालयास करून देण्यात आली.






## गौरवगाथा पुस्तकातून राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार व राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार विजेत्यांना मिळणार प्रसिध्दी

**- डॉ. राजाराम दिघे, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई**

दिनांक १० जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून, २०२१ या कालावधीत **'महा आवास अभियान-ग्रामीण'** मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** व **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** देऊन गौरव करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार ग्रामस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तरावर **'महा आवास अभियान पुरस्कार'** वितरणाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. त्याबद्दल **महा आवास अभियान पुरस्कार प्राप्त सर्व विजेत्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

**'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार'** व **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** नामांकने निवड करण्यासाठी दिनांक १३/०९/२०२१ रोजी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये राज्यस्तरीय पुरस्कार नामांकनाची निवड करण्यात आली.

**'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार'** व **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** या पुरस्कार विजेत्यांना प्रसिध्दी मिळावी, यासाठी राज्यस्तरावरून **'गौरवगाथा पुस्तक'** प्रकाशित करण्यात येणार असल्याची माहिती राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयचे संचालक, डॉ. राजाराम दिघे यांनी दिली. या पुस्तकामध्ये **'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार'** व **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** विजेत्या संस्था/ व्यक्ती यांच्या अभियान कालावधीतील सर्वोत्कृष्ट कार्याची यशोगाथा, महा आवास अभियान पुरस्कार विषयी माहिती व अभियान कालावधीत राबविण्यात आलेले विविध उपक्रमाचे छायाचित्र व मिडिया गॅलरी प्रकाशित करण्यात येणार आहे.

**'गौरवगाथा'** या पुस्तकाचे प्रकाशन राज्यस्तरीय महा आवास पुरस्कार वितरण सोहळ्यात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, ग्रामविकास, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.



# राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार नामांकन निवड करण्यासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीची समन्वय बैठक

**'सर्वांसाठी घरे- २०२२'** या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामासा गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी दि. २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत **महा आवास अभियान-ग्रामीण** राबविण्यात आले. दि. १० जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास पंचायत राज विभाग तथा राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीचे अध्यक्ष, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/०९/२०२१ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे दालनात, ७ वा मजला , बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई येथे सकाळी ११.०० वाजता बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, श्री. नितिन करीर, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे, सह सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. दिनेश डिंगळे, सहसचिव, (कामगार) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, श्री. श. म. साठे, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, श्री. म. रं. शेळके, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कार्यकारी मंडळ, श्री. श्री.चु. श्रीरंगम, कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, श्री. सतिश कडवे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन विकास विभाग, श्रीमती सं. दि. शेळके इत्यादी समिती सदस्य उपस्थित होते.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण तथा राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती, सदस्य सचिव, डॉ. राजाराम दिघे यांनी या बैठकीत सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीच्या विषय पत्रिकेनुसार राज्यातील महा आवास अभियान-ग्रामीण च्या अंमलबजावणी बाबत सदस्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच डॉ. राजाराम दिघे यांनी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यात विविध स्तरावर देण्यात येणाऱ्या पुरस्काराबाबत बैठकीमध्ये सादरीकरण केले. विभागीय अंमलबजावणी संनियंत्रण व मूल्यमापन समिती कडील प्राप्त अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार नामांकनाची निवड केली.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

**सर्वोत्कृष्ट विभाग**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट जिल्हे**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट तालुके**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट गृह संकुल**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

### राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

**सर्वोत्कृष्ट विभाग**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट जिल्हे**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक





**सर्वोत्कृष्ट तालुके**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**सर्वोत्कृष्ट गृह संकुल**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

## -: महा आवास अभियान विशेष पुरस्कार :-

महा आवास अभियान पुरस्कारांच्या व्यतिरिक्त केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना यांच्या अभियान कालावधीतील संख्यात्मक प्रगतीनुसार पुढील १० उपक्रमांमध्ये राज्यस्तरावरुन सर्वोत्तम ३ जिल्ह्यांना विशेष पुरस्कार देण्यात येतील. त्यानुसार विभागीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती कडील प्राप्त अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार नामांकनाची निवड करण्यात आली.

**१) भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे**

**अ) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**ब) राज्य पुरस्कृत आवास योजना मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**२) घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे**

**अ) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**ब) राज्य पुरस्कृत आवास योजना मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**३) मंजूर घरकुले १०० टक्के भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे**

**अ) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**ब) राज्य पुरस्कृत आवास योजना मधील संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**४) पुरेशी जागा नसल्यास बहुमजली इमारती बांधणे**

**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण + राज्य पुरस्कृत आवास योजना यांच्या एकत्रित संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**५) पुरेशी जागा असल्यास गृह संकुल उभारणे**

**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण + राज्य पुरस्कृत आवास योजना यांच्या एकत्रित संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**६) लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे-दगड, विटा, वाळू, सिमेंट, स्टिल, छताचे साहित्य इ. उपलब्ध करुन देण्यासाठी महिला बचत गटांच्या सहभागातून घरकुल मार्ट सुरु करणे**

**संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**७) लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी वित्तीय संस्थांचे रु.७०,०००/- कर्ज स्वरुपात मिळवूण देणे**

**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण + राज्य पुरस्कृत आवास योजना यांच्या एकत्रित संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**८) मुलभूत नागरी सुविधा देवून आदर्श घरांची निर्मिती करणे**

**संख्यात्मक प्रगतीनूसार सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**९) कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सहकारी संस्था यांचे सहकार्य घेणे**

**राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने निवडलेले सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक





**१०) इतर विशेष उपक्रम**

**राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने निवडलेले सर्वोत्तम जिल्हे -**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

मा. अध्यक्ष व सर्व समिती सदस्यांच्या मान्यतेने **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार' शबरी आवास योजना** व **रमाई आवास योजना सर्वोत्तम जिल्हे** पुरस्काराची नामांकनाची निवड करण्यात आली.

**११) रमाई आवास योजना पुरस्कार**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

**१२) शबरी आवास योजना पुरस्कार**

प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक, तृतीय क्रमांक

मा. अध्यक्ष व सर्व समिती सदस्यांच्या मान्यतेने **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार' उल्लेखनिय कामगिरीसाठी अधिकारी/ कर्मचारी** यांच्या नामांकनाची निवड करण्यात आली.

**१३) अभियान कालावधीत उल्लेखनिय कामगिरीसाठी अधिकारी / कर्मचारी यांना पुरस्कार**

१. राज्यस्तरीय अधिकारी
२. विभागीय प्रोग्रामर
३. जिल्हा प्रोग्रामर
४. जिल्हा डाटा एन्ट्री ऑपरेटर
५. तालुका डाटा एन्ट्री ऑपरेटर
६. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता

राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीचे मा. अध्यक्ष व समिती सदस्यांच्या मान्यतेने सर्व **'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार'** व **'राज्यस्तरीय महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** या पुरस्कारांची नामांकने निवडण्यात आली. त्यांनतर मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सर्व समिती सदस्य व उपस्थितांचे आभार समितीचे सदस्य सचिव तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मानले, व समितीची समन्वय बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.




## ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयाकडून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या उद्दिष्टपूर्तीसाठी समन्वय बैठका

मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या उद्दिष्टपूर्तीसाठी माहे जुलै ते सप्टेंबर २०२१ या कालावधीत सर्व राज्यांच्या समन्वय बैठका घेतल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये राज्यास घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. सदर उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याने राबविलेल्या उपाययोजना व राज्याने केलेली उद्दिष्टपूर्ती या विषयी आढावा घेण्यात आला. तसेच उर्वरीत उद्दिष्टपूर्तीचे नियोजन राज्याकडून घेण्यात आले. तसेच आवासॉफ्ट मधील बदलांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उद्दिष्टपूर्तीसाठी गेल्या वर्षी राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले होते. या अभियानामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये अधिक गतिमानता व गुणवत्ता आली. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात आलेली गतिमानता व गुणवत्तेत सातत्य कायम ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्यात यावर्षीही महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येणार असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.

तसेच भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी राज्यात टास्क फोर्स समितीची स्थापना करण्यात आली असून यामुळे जागे अभावी प्रलंबित घरकुले व भुमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार असे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.



## मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक



मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, महाराष्ट्र राज्य, श्री. अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली व मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेण्यासाठी दिनांक २७/०७/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता मंत्रालय मुंबई येथे समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीला आदिवासी विकास विभागाचे उपसचिव व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध ग्रामीण आवास योजनांच्या प्रगती बाबत सादरीकरण केले. त्यानंतर मा. राज्यमंत्री महोदयांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व आदिवासी विकास अर्थसहाय्यीत राज्य पुरस्कृत शबरी आवास योजनांच्या प्रगती बाबत आढावा घेण्यात आला. तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील शबरी आवास योजनेच्या उद्दिष्टांबाबत चर्चा करण्यात आली.

## राज्यात ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून कुशल गवंडी फोर्सची निर्मिती करावी

**- डॉ. राजाराम दिघे, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई**


मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी साप्ताहिक बैठकांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार माहे एप्रिल, मे व जून २०२१ मध्ये प्रत्येक आठवड्यात दर सोमवारी ग्रामीण गवंडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी तसेच राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. येत्या कालावधीत जिल्हास्तरावर डेमो हाऊसेस उभारण्यात येणार असल्याचे संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले.

या बैठकामध्ये ग्रामीण गंवडी प्रशिक्षण विहीत मुदतीत पूर्ण करणे, संस्थाचे अधिकारी/ पदाधिकारी यांनी प्रत्यक्षात क्षेत्रीय भेट देवून अपूर्ण व मंजूरी दिलेली घरकुले जलद गतीने पूर्ण करणे, प्रशिक्षित गवंडयांचे मुल्यांकन सी. एस. डी. सी. आय. मार्फत करणे, गवंडी प्रशिक्षणाचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण करणे अशा सूचना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी संस्थेच्या अधिकारी/पदाधिकारी यांना दिल्या. राज्यात मोठ्या प्रमाणात घरकुलांचे बांधकाम करावयाचे आहे. याकरीता राज्यात मोठ्या प्रमाणात कुशल गवंड्यांची आवश्यता आहे. त्याकरीता राज्यात जास्तीत गवंडी प्रशिक्षण घेवून कुशल गवंड्याची निर्मिती करावी व घरकुल गवंडी फोर्सची निर्मिती करावी. असे डॉ. राजाराम दिघे यांनी बैठकीला उपस्थित सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सांगितले.

राज्यात सर्व ग्रामीण आय. आय. टी. मुंबई व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या समन्वयाने सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध साहित्यांच्या वापरातून घरकुल बांधकाम, कमी खर्चात चांगल्या गुणवत्तेचे घरकुल बांधकाम व घरकुल बांधकामात नवनवीन तंत्रज्ञान वापरून घरकुल बांधकामात गतिमानता आणणे या विषयी माहिती देण्यात आली. आय. आय. टी. मुंबई प्रशिक्षित ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांनी आधुनिक तंत्रज्ञाना विषयी माहिती ग्रामीण गवंडी प्रशिक्षणा दरम्यान देण्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.





## ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करण्याकरीता कृतीदल (Task Force) ची स्थापना

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत करण्यात येते. राज्यात जागे अभावी प्रलंबित घरकुले व लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यात अडचणी निर्माण होत आहे. राज्यात घरकुल बांधकामासाठी भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करण्याकरीता कृतीदल (Task Force) गठीत करण्याचा प्रस्ताव संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आला.

त्यानुसार ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.:प्रआयो-२०२१/प्र.क्र.४५/योजना-१०, दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करण्याकरीता राज्यस्तर व विभागस्तरावर पुढील प्रमाणे कृतीदल (Task Force) स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

### राज्यस्तरीय कृतीदल

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३ | अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | सदस्य |
| ४ | संबंधित विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव | सदस्य |
| ५ | विभागीय आयुक्त (सर्व) | सदस्य |
| ६ | उप सचिव, केंद्रीय योजना ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ७ | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण | सदस्य सचिव |

### राज्यस्तरीय कृतीदलाची कार्यकक्षा

अ) राज्यस्तरीय कृतीदलाची वर्षातून दोन वेळा बैठक घेण्यात यावी.

ब) राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन देण्याकरिता धोरण निश्चित करणे.

क) भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन देण्याच्या धोरणाचे सनियंत्रण करणे.

ड) क्षेत्रीय स्तरावरील या धोरणाचे अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन करणे.

### विभागस्तरीय कृतीदल

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | जिल्हाधिकारी (सर्व) | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) | सदस्य |
| ४ | संबंधित क्षेत्रातील कार्यालयाचे अधिकारी | सदस्य |
| ५ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) | सदस्य |
| ७ | उपायुक्त (विकास) | सदस्य सचिव |

### विभागस्तरील कृतीदलाची कार्यकक्षा

अ) विभागस्तरीय कृतीदलाची बैठक महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी.

ब) विभागातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करावयाच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

क) विभागातील भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन देण्याच्या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाकडून येणाऱ्या सूचनांबाबत जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांना अवगत करणे.

ड) विभागातील भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन देण्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत ग्रामविकास विभाग व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून संबंधितांना कळविण्यात आले आहे.

योजनांची सद्यस्थिती

# प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१६-१७ ते २०२०-२१

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | कामगिरी निर्देशांकानुसार (Performance Index ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
| १ | अकोला | ४४५५७ | ३८४६३ | २७८६४ | ६२.५४ | २९ | ४४३ |
| २ | अमरावती | ९०५१२ | ६८८३८ | ५०३०३ | ५५.५८ | ३३ | ४८६ |
| ३ | बुलढाणा | २८१४६ | २३८९० | १७३५२ | ६१.६५ | २१ | ४०७ |
| ४ | वाशिम | १०५७३ | ९०५२ | ६१०४ | ५७.७३ | ३१ | ४६२ |
| ५ | यवतमाळ | ३९६१० | ३८७०१ | २५४६६ | ६४.२९ | १३ | ३५६ |
| अमरावती विभाग | | २१३३९८ | १७८९४४ | १२७०८९ | ५९.५५ | | |
| ६ | औरंगाबाद | २२१३१ | २२०८९ | १५५११ | ७०.०९ | ९ | ३१४ |
| ७ | बीड | १९६९६ | १८२७२ | ११७८८ | ५९.८५ | २३ | ४१५ |
| ८ | हिंगोली | १०११० | ९५०४ | ७८४० | ७७.५५ | १९ | ३८४ |
| ९ | जालना | १३३२५ | ११५७२ | ८१२८ | ६१.०० | २६ | ४२८ |
| १० | लातूर | १०९३३ | ९२७० | ७०७९ | ६४.७५ | १७ | ३७७ |
| ११ | नांदेड | ४८५९१ | ४५१०५ | २५८४९ | ५३.२० | ३२ | ४७९ |
| १२ | उस्मानाबाद | ६०४४ | ५३२३ | ४०२५ | ६६.५९ | १६ | ३७३ |
| १३ | परभणी | ७०९५ | ६७६८ | ५१५२ | ७२.६१ | १८ | ३८० |
| औरंगाबाद विभाग | | १३७९२५ | १२७९०३ | ८५३७२ | ६१.९० | | |
| १४ | पालघर | २५६८२ | २५६५८ | २३४७० | ९१.३९ | २ | १७३ |
| १५ | रायगड | ७७५७ | ७७४८ | ७०१२ | ९०.४० | ७ | २५२ |
| १६ | रत्नागिरी | ६०२६ | ५९७३ | ५३४४ | ८८.६८ | ३ | २०८ |
| १७ | सिंधुदुर्ग | ३९९४ | ३६६८ | ३१७९ | ७९.५९ | ११ | ३४३ |
| १८ | ठाणे | ६७३३ | ६७०८ | ६२१४ | ९२.२९ | १ | १६४ |
| कोकण विभाग | | ५०१९२ | ४९७५५ | ४५२१९ | ९०.०९ | | |
| १९ | भंडारा | ५५१४४ | ५२०१० | ३०४८५ | ५५.२८ | २८ | ४३३ |
| २० | चंद्रपुर | ३१४८२ | २८७२२ | २१३६७ | ६७.८७ | १० | ३३९ |
| २१ | गडचिरोली | २२८५४ | २१८२३ | १५५४० | ६८.०० | १५ | ३६४ |
| २२ | गोंदिया | ८२३७५ | ८२३७५ | ६८८६७ | ८३.६० | ५ | २४४ |
| २३ | नागपूर | ३८५९२ | ३२४९१ | २२४३० | ५८.१२ | २७ | ४३० |
| २४ | वर्धा | १६१६४ | १३१०७ | १०२१२ | ६३.१८ | २० | ४०१ |
| नागपूर विभाग | | २४६६११ | २३०५२८ | १६८९०१ | ६८.४९ | | |
| २५ | अहमदनगर | ४७८०८ | ४११०५ | ३१४६१ | ६५.८१ | २५ | ४२९ |
| २६ | धुळे | ४६४८० | ४६४५६ | ३७७५५ | ८१.२३ | ६ | २४६ |
| २७ | जळगाव | ६३३७२ | ५५१४६ | ३७७५६ | ५९.५८ | ३४ | ४८९ |
| २८ | नंदुरबार | १०४०५४ | ९९६६२ | ७३५२२ | ७०.६६ | १२ | ३५३ |
| २९ | नाशिक | ७०३१७ | ६८५५० | ५६०१७ | ७९.६६ | ४ | २१२ |
| नाशिक विभाग | | ३३२०३१ | ३११७१९ | २३६५११ | ७१.२३ | | |
| ३० | कोल्हापूर | १४३७७ | १२९९५ | १०१४२ | ७०.५४ | ८ | २६८ |
| ३१ | पुणे | १८८२२ | १५३६२ | १०४३५ | ५५.४४ | ३० | ४५७ |
| ३२ | सांगली | १८३८० | १५९१४ | १०२६१ | ५५.८३ | २४ | ४१६ |
| ३३ | सातारा | १३१७० | ११०७४ | ७८७४ | ५९.७९ | १४ | ३६३ |
| ३४ | सोलापूर | ४४२२८ | ३६४३८ | २४०५२ | ५४.३८ | २२ | ४०८ |
| पुणे विभाग | | १०८९७७ | ९१७८३ | ६२७६४ | ५७.५९ | | |
| एकुण | | १०८९१३४ | ९९०६३२ | ७२५८५६ | ६६.६५ | | |

# रमाई आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | अमरावती | १०२९२ | १०२३८ | ७५९३ | ७३.७८ | १४ |
| २ | बुलढाणा | १०९११ | १०९०९ | ७९७२ | ७३.०६ | १६ |
| ३ | यवतमाळ | १२३४१ | १२२४७ | ८३३७ | ६७.५६ | २१ |
| ४ | अकोला | १२४०२ | १२१८८ | ७८२६ | ६३.१० | २५ |
| ५ | वाशिम | ७१६६ | ७१६६ | ४२६८ | ५९.५६ | २७ |
| अमरावती विभाग | | ५३११२ | ५२७४८ | ३५९९६ | ६७.७७ | |
| ६ | परभणी | १३८४१ | १३७९० | १०३७५ | ७४.९६ | १३ |
| ७ | हिंगोली | ६७२८ | ६४४८ | ४९५३ | ७३.६२ | १५ |
| ८ | लातूर | १९३८५ | १८९९० | १२०५९ | ६२.२१ | २६ |
| ९ | औरंगाबाद | १५३५६ | १५१८२ | ८१२९ | ५२.९४ | २९ |
| १० | बीड | १५७३५ | १४११५ | ७६८८ | ४८.८६ | ३० |
| ११ | जालना | ९००७ | ८०६६ | ३९९५ | ४४.३५ | ३२ |
| १२ | नांदेड | १६३०० | १४३०८ | ७०१३ | ४३.०२ | ३३ |
| १३ | उस्मानाबाद | १४४४७ | १४४४७ | ५५३६ | ३८.३२ | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | ११०७९९ | १०५३४६ | ५९७४८ | ५३.९२ | |
| १४ | सिंधुदुर्ग | १७७५ | १७७४ | १५६९ | ८८.३९ | १ |
| १५ | रत्नागिरी | ५६८४ | ५६८४ | ५०२३ | ८८.३७ | २ |
| १६ | रायगड | १६८९ | १६७९ | १४०३ | ८३.०७ | ४ |
| १७ | ठाणे | १०२१ | १०१४ | ८३० | ८१.२९ | ६ |
| १८ | पालघर | ३९७ | ३९५ | २८८ | ७२.५४ | १७ |
| कोकण विभाग | | १०५६६ | १०५४६ | ९११३ | ८६.२५ | |
| १९ | नागपूर | ७०३९ | ७०३९ | ५७६२ | ८१.८६ | ५ |
| २० | गोंदिया | ७७३२ | ७७७८ | ६१४८ | ७९.५१ | ९ |
| २१ | वर्धा | ५६३२ | ५६३२ | ४४२९ | ७८.६४ | १० |
| २२ | भंडारा | ११०७५ | १०६४४ | ७६०२ | ६८.६४ | १९ |
| २३ | गडचिरोली | ५८८० | ५७८० | ३८७९ | ६५.९७ | २३ |
| २४ | चंद्रपुर | १८८७३ | १६१४९ | ८४९२ | ४५.०० | ३१ |
| नागपूर विभाग | | ५६२३१ | ५३०२२ | ३६३१२ | ६४.५८ | |
| २५ | धुळे | ५५४९ | ५५३२ | ४२४० | ७६.४१ | ११ |
| २६ | अहमदनगर | २४९०० | २४८९९ | १८६९४ | ७५.०८ | १२ |
| २७ | नाशिक | ९२७७ | ९१५४ | ६१७३ | ६६.५४ | २२ |
| २८ | जळगाव | १२३५१ | १२३४४ | ८०५५ | ६५.२२ | २४ |
| २९ | नंदुरबार | २७१९ | २३२३ | १५३१ | ५६.३१ | २८ |
| नाशिक विभाग | | ५४७९६ | ५४२५२ | ३८६९३ | ७०.६१ | |
| ३० | कोल्हापूर | १०८२३ | १०८२३ | ९०२६ | ८३.४० | ३ |
| ३१ | सोलापूर | १४५९७ | १४४९७ | ११६८७ | ८०.०६ | ७ |
| ३२ | सातारा | ९४०८ | ९४०६ | ७४८६ | ७९.५७ | ८ |
| ३३ | सांगली | ६९८४ | ६९५१ | ४८४७ | ६९.४० | १८ |
| ३४ | पुणे | ८०५९ | ७९८४ | ५५२० | ६८.४९ | २० |
| पुणे विभाग | | ४९८७१ | ४९६६१ | ३८५६६ | ७७.३३ | |
| एकुण | | ३३५३७५ | ३२५५७५ | २१८४२८ | ६५.१३ | |

# शबरी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | बुलढाणा | ९०८ | ९०७ | ७२३ | ७९.६३ | १४ |
| २ | यवतमाळ | ४६९६ | ४६९८ | ३४८५ | ७४.२१ | १७ |
| ३ | अमरावती | ३६९८ | ३६३१ | २७०६ | ७३.१७ | १८ |
| ४ | वाशिम | ४८२ | ४८२ | ३१३ | ६४.९४ | २६ |
| ५ | अकोला | १४२२ | ११०४ | ७१२ | ५०.०७ | ३० |
| अमरावती विभाग | | ११२०६ | १०८२२ | ७९३९ | ७०.८५ | |
| ६ | हिंगोली | २९८२ | २९२५ | २५७८ | ८६.४५ | ७ |
| ७ | जालना | ४६३ | ४४२ | ३३० | ७१.२७ | २० |
| ८ | नांदेड | १०९४ | १०४१ | ७४४ | ६८.०१ | २३ |
| ९ | औरंगाबाद | २३५७ | २२७४ | १५८८ | ६७.३७ | २४ |
| १० | उस्मानाबाद | १९० | १८२ | १२३ | ६४.७४ | २७ |
| ११ | लातूर | ५८० | ४३६ | ३२३ | ५५.६९ | २९ |
| १२ | परभणी | ६४६ | ६४४ | ३०८ | ४७.६८ | ३१ |
| १३ | बीड | ५९७ | ४१५ | २२१ | ३७.०२ | ३४ |
| औरंगाबाद | | ८९०९ | ८३५९ | ६२१५ | ६९.७६ | |
| १४ | सिंधुदुर्ग | २२ | २२ | २२ | १००.०० | १ |
| १५ | ठाणे | १६३३ | १६३१ | १५७८ | ९६.६३ | २ |
| १६ | रायगड | १२२३ | १२२१ | ११५८ | ९४.६९ | ३ |
| १७ | रत्नागिरी | १७९ | १७९ | १५५ | ८६.५९ | ६ |
| १८ | पालघर | ५३५८ | ५३३८ | ४४९८ | ८३.९५ | ९ |
| कोकण विभाग | | ८४१५ | ८३९१ | ७४११ | ८८.०७ | |
| १९ | नागपूर | २१७३ | २१७३ | १८६५ | ८५.८३ | ८ |
| २० | गोंदिया | १८३५ | १७७३ | १४८० | ८०.६५ | १३ |
| २१ | वर्धा | २६०२ | २६०२ | १८७७ | ७२.१४ | १९ |
| २२ | चंद्रपुर | ५१८२ | ५०५६ | ३४०१ | ६५.६३ | २५ |
| २३ | गडचिरोली | ३९०७ | ३८०० | २३५२ | ६०.२० | २८ |
| २४ | भंडारा | ४३११ | ४१७८ | १९२२ | ४४.५८ | ३२ |
| नागपूर विभाग | | २००१० | १९५८२ | १२८९७ | ६४.४५ | |
| २५ | अहमदनगर | ३४५३ | ३४५३ | २७९५ | ८०.९४ | १२ |
| २६ | धुळे | ६३७० | ६३५३ | ५५२६ | ८६.७५ | ५ |
| २७ | जळगाव | ४६१५ | ४६१५ | ३६०१ | ७८.०३ | १५ |
| २८ | नंदुरबार | ७५७८ | ७५६१ | ५७८३ | ७६.३१ | १६ |
| २९ | नाशिक | ९७३० | ९७०३ | ६६८५ | ६८.७१ | २१ |
| नाशिक विभाग | | ३१७४६ | ३१६८५ | २४३९० | ७६.८३ | |
| ३० | सोलापूर | ६०१ | ५८० | ५२८ | ८७.८५ | ४ |
| ३१ | पुणे | २१९१ | २१८२ | १८३२ | ८३.६१ | १० |
| ३२ | सातारा | १२७ | १२१ | १०३ | ८१.१० | ११ |
| ३३ | सांगली | ६० | ४८ | ४१ | ६८.३३ | २२ |
| ३४ | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | ४३.३३ | ३३ |
| पुणे विभाग | | ३००९ | २९४४ | २५१७ | ८३.६५ | |
| एकुण | | ८३२९५ | ८१७८३ | ६१३६९ | ७३.६८ | ३५ |

# पारधी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | वाशिम | ६४ | ६४ | ६० | ९३.७५ | ४ |
| २ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३३३ | ८९.७६ | ५ |
| ३ | अमरावती | ४५१ | ४४४ | ३८६ | ८५.५९ | ८ |
| ४ | अकोला | ३७४ | ३७३ | ३१५ | ८४.२२ | ९ |
| ५ | यवतमाळ | ५९४ | ५९१ | ३६९ | ६२.१२ | १९ |
| | अमरावती विभाग | १८५४ | १८४३ | १४६३ | ७८.९१ | |
| ६ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.०० | १ |
| ७ | परभणी | ५६ | ५६ | ५० | ८९.२९ | ६ |
| ८ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | ८४.०० | १० |
| ९ | बीड | ९२ | ८५ | ७२ | ७८.२६ | १२ |
| १० | लातूर | १७ | १३ | १३ | ७६.४७ | १३ |
| ११ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | १८८ | ७६.११ | १४ |
| १२ | औरंगाबाद | ५७ | ५० | ३१ | ५४.३९ | २३ |
| १३ | जालना | ३८ | ३२ | १४ | ३६.८४ | २५ |
| | औरंगाबाद विभाग | ५९२ | ५६० | ४४५ | ७५.१७ | |
| १४ | पालघर | ० | ० | ० | ०.०० | २६ |
| १५ | रायगड | २ | ० | ० | ०.०० | २७ |
| १६ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०० | २८ |
| १७ | सिंधुदुर्ग | १ | ० | ० | ०.०० | २९ |
| १८ | ठाणे | ० | ० | ० | ०.०० | ३० |
| | कोकण विभाग | ४ | ० | ० | ०.०० | |
| १९ | वर्धा | ५० | ५० | ४३ | ८६.०० | ७ |
| २० | नागपूर | ४८ | ४६ | ३३ | ६८.७५ | १८ |
| २१ | चंद्रपुर | ३५ | १९ | १७ | ४८.५७ | २४ |
| २२ | भंडारा | ० | ० | ० | ०.०० | ३१ |
| २३ | गडचिरोली | ० | ० | ० | ०.०० | ३२ |
| २४ | गोंदिया | ० | ० | ० | ०.०० | ३३ |
| | नागपूर विभाग | १३३ | ११५ | ९३ | ६९.९२ | |
| २५ | धुळे | ४३२ | ४३१ | ४०६ | ९३.९८ | ३ |
| २६ | जळगाव | ४१७ | ३७६ | ३१६ | ७५.७८ | १५ |
| २७ | अहमदनगर | १९८ | १९८ | १४७ | ७४.२४ | १६ |
| २८ | नाशिक | ९२ | ९१ | ५५ | ५९.७८ | २० |
| २९ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०० | ३४ |
| | नाशिक विभाग | ११४९ | १०९६ | ९२४ | ८०.४२ | |
| ३० | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.०० | २ |
| ३१ | सोलापूर | २३१ | २०२ | १८८ | ८१.३९ | ११ |
| ३२ | सातारा | २४ | १८ | १७ | ७०.८३ | १७ |
| ३३ | पुणे | १८८ | १५९ | १११ | ५९.०४ | २१ |
| ३४ | सांगली | ३८ | २४ | २१ | ५५.२६ | २२ |
| | पुणे विभाग | ४८८ | ४१० | ३४४ | ७०.४९ | |
| | एकुण | ४२२० | ४०२४ | ३२६९ | ७७.४६ | |

# आदिम आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % |
| १ | यवतमाळ | १५५४ | १५५४ | १०४६ | ६७.३१ |
| अमरावती विभाग | | १५५४ | १५५४ | १०४६ | ६७.३१ |
| २ | नांदेड | ४१९ | १८० | ७६ | १८.१४ |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८० | ७६ | १८.१४ |
| ३ | रायगड | ९१६ | ९१३ | ८६७ | ९४.६५ |
| ४ | ठाणे | ८४६ | ८४५ | ७९४ | ९३.८५ |
| ५ | सिंधुदुर्ग | ५३ | ४९ | ४८ | ९०.५७ |
| ६ | पालघर | ६११ | ६११ | ४११ | ६७.२७ |
| कोकण विभाग | | २४२६ | २४१८ | २१२० | ८७.३९ |
| ७ | वर्धा | २६ | २६ | २३ | ८८.४६ |
| ८ | गडचिरोली | १६९० | १५४२ | १०६६ | ६३.०८ |
| ९ | चंद्रपूर | ६३८ | ३७७ | १९६ | ३०.७२ |
| १० | नागपूर | २२२ | ० | ० | ०.०० |
| नागपूर विभाग | | २५७६ | १९४५ | १२८५ | ४९.८८ |
| ११ | नाशिक | १२ | १२ | १० | ८३.३३ |
| नाशिक विभाग | | १२ | १२ | १० | ८३.३३ |
| १२ | पुणे | १९ | ० | ० | ०.०० |
| पुणे विभाग | | १९ | ० | ० | ०.०० |
| एकुण | | ७००६ | ६१०९ | ४५३७ | ६४.७६ |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२१

| अ. क्र. | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % |
| १ | यवतमाळ | ८० | ४१ | २० | २५.०० |
| २ | अमरावती | ४५ | ४५ | ११ | २४.४४ |
| अमरावती विभाग | | १२५ | ८६ | ३१ | २४.८० |
| ३ | उस्मानाबाद | ३६७ | ३१५ | १३८ | ३७.६० |
| ४ | लातूर | १० | १० | १ | १०.०० |
| औरंगाबाद विभाग | | ३७७ | ३२५ | १३९ | ३६.८७ |
| ४ | गोंदिया | २० | २० | २० | १००.०० |
| नागपूर विभाग | | २० | २० | २० | १००.०० |
| ५ | अहमदनगर | २० | ० | ० | ०.०० |
| नाशिक विभाग | | २० | ० | ० | ०.०० |
| ६ | सोलापूर | ४ | ४ | २ | ५०.०० |
| पुणे विभाग | | ४ | ४ | २ | ५०.०० |
| एकुण | | ५४६ | ४३५ | १९२ | ३५.१६ |

# महा आवास अभियानामुळे गृह संकुल उभारणी

नागपूर विभागात राष्ट्रपिता महात्मागांधीचे वास्तव्य व आश्रम असलेला वर्धा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यामध्ये पारडी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत गृह संकुलाची उभारणी करण्यात आली आहे. यामुळे तेथील घरकुल लाभार्थ्यांना सर्व मुलभूत नागरी सुविधायुक्त स्वतःचे हक्काचे घर मिळाले आहे.


ग्रामपंचायत पारडी हे गाव वणा नदी काठी वसलेले आहे. या गावातील नागजी महाराज देवस्थान पंचकृषीत प्रसिध्द आहे. या गावाची कुटुंब संख्या १५ असून गावात एकुण १५ घरकुलास पात्र लाभार्थी आहे. या गावामध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ८ घरकुल लाभार्थ्यांसाठी गृह संकुलाची उभारणी केली आहे. यामध्ये एकुण ३० लोक वास्तव्यास आहेत. याकरीता ग्रामीपंचायतीचे सरपंच, श्री. प्रफुल बाडे, उपसरपंच, श्री. कैलास अ कांबळे, ग्रामसेवक, श्री. संदीप चव्हाण, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, श्री. गणेश कुऱ्हाडे व सुरज तिमांडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

ग्रामपंचायत पारडी येथे महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत ७ घरकुले मंजूर करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १ घरकुल मंजूर करण्यात आले. मंजूर करण्यात आलेले सर्व घरकुलांचे लाभार्थी एकाच वॉर्ड मधील असल्याने त्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच, श्री. प्रकुल बाडे यांच्याशी चर्चा करून बांधकाम सुरु करताना सर्व घरांची एक सारखी रचना करण्याचे सांगितले. सरपंचानी लाभार्थ्यांच्या प्रस्तावाचे स्वागत करत तसे ले-आऊट देण्याचे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना सांगितले. त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांनी ले-आऊट दिले.

पंचायत समिती हिंगणघाट स्तरावरून मंजूर घरकुलांना तात्काळ पहिला हप्ता वितरीत करण्यात आल्याने लाभार्थ्यांनी विनाविलंब घरकुल बांधकामाला सुरूवात केली. गावाजवळच स्वयंसहायता समूह महिलांच्या बचत गटामार्फत **घरकुल मार्ट** सुरु करण्यात आल्याने घरकुल बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे सिमेंट, लोखंड, वाळू, गिट्टी, दरवाजे, खिडकी, छताचे व इतर साहित्य एकाच ठिकाणी बाजार भावाप्रमाणे मिळाले. घरकुल मार्ट मुळे साहित्य वाहतुकीचा खर्च तर वाचला पण एकत्रित साहित्य खरेदी मुळे वाजवी दरात साहित्य मिळाल्याने मोठ्या प्रमाणात पैशांची बचत झाली. गावाला जवळ नदी असल्यामुळे वाळू कमी दरात मिळाली. त्यामुळे सर्वच लाभार्थींना घरकुलांचे बांधकाम करतांना वाळूची कमतरता जाणवली नाही. संपूर्ण गृह संकुलाचे बांधकाम सरपंच व लाभार्थी यांच्या मनाप्रमाणे करण्यात आले. घरकुल बांधकाम करतांना समोरील बाजूस मोठी रूम (हॉल) व मागील स्वयंपाकघराचे बांधकाम करण्यात आले. पंचायत समितीकडून वेळेत निधी मिळाल्याने व सरपंच यांच्या प्रोत्साहानामुळे सर्व लाभार्थींनी पक्के स्लॅबचे घरकुल बांधकाम केले आहे. तसेच घरासमोर १ पोर्च तयार केला आहे. सर्व घरांची रचना एक समान असल्याने या गृह संकुलाची शोभा वाढली आहे.

ग्रामपंचायत पारडी येथे उभारण्यात आलेल्या गृहसंकुलातील लाभार्थ्यांना शासकीय योजनांशी कृतीसंगम करून महात्मा गांधी रोजगार हमी योजना मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजीविकेचे साधन इ. चा लाभ देण्यात आला आहे. यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे जीवनमान उंचवण्यास मदत झाली असून संपूर्ण गावात व घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.





# महा आवास अभियानात कारंजा अव्वलस्थानी

महा आवास अभियान-ग्रामीण मुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजना मध्ये गतिमानता व गुणवत्ता आली आहे. याकरीता सर्वस्तरावरून सक्रीय सहभाग नोंदविला आहे. यामध्ये तालुकास्तरीय यंत्रणेचाही मोठा वाटा आहे. अमरावती विभागातील वाशिम जिल्ह्यामध्ये कारंजा तालुक्यात अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. याकरीता पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री. कालिदास रघूनाथ तापी, सहायक गटविकास अधीकारी, श्री. मोहन श्रृंगारे, विस्तार अधीकारी, श्री. साहेबराव चव्हाण, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, श्री. गोपाल जिचकार व पंचायत समिती स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पंचायत समिती कारंजा अंतर्गत महा आवास अभीयान-ग्रामीण दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीमध्ये राबविण्यात आले. अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना इ. ग्रामीण गृहनिर्माण योजना ग्रामीण भागातील लाभार्थ्यांकरीता प्रभाविपणे राबविण्यात आल्या. अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे बहूतांश उदिष्ट साध्य करण्यात आले. यामध्ये ३९५ भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता, १७५० घरकुलांच्या उदीष्टाप्रमाणे मंजूरी, १७२२ मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण, १३६९ घरकुले भौतिकदृष्टया पुर्ण, ११४ प्रलंबित घरकुले पूर्ण, १३७७ घरकुले आर्थीकदृष्टया पुर्ण, १० ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पुर्ण, डेमो हाऊस उभारणी, १९५४ लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण, १९७५ जॉब कार्ड मपिंग पूर्ण, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने मधून १९७०५५ लाभार्थ्यांना रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून १४३५ लाभार्थ्यांना शौचालय, जल जीवन मिशन मधून १७५० लाभार्थ्यांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून १२५० लाभार्थ्यांना गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून १५५० लाभार्थ्यांना विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधून १७५० लाभार्थ्यांना उपजिवीकेचे साधन इ. उद्दिष्टपूर्ती अभियान कालावधीत करण्यात आली. या उदीष्ट पुर्तीसाठी तालुकास्तरीय आढावा बैठका, दरमहा लाभार्थी, सरपंच व ग्रामसेवक यांच्या बैठका, लाभार्थीनिहाय आढावा घेवून घरकुलांचे तसेच प्रलबित घरकुलांचे बांधकाम अभियान कालावधीत पूर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या. अपुर्ण घरकुले पुर्ण करण्यासाठीच्या अडचणी वर सवितस्तर चर्चा करून वाळू व जागा उपलब्धते बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अभियान कालावधीत वरिष्ठ कार्यालयाकडून अतिशय चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे वेळोवेळी आलेल्या अडचणी पूर्णपणे सोडविण्यास मदत केली असल्याचे गट विकास अधिकारी यांनी सांगितले.

महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट पंचायत समिती म्हणून कारंजा पंचायत समितीला महा आवास अभियान पुरस्कार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, शंभुराजे देसाई यांच्या शुभहस्ते व जिल्हाधिकारी वाशिम, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थित देवून गौरविण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सभापती, गट विकास अधिकारी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते. याकामी ग्रामपंचायतीचे घरकुल लाभार्थी, ग्रामसेवक, सरपंच व पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे गट विकास अधिकारी यांनी सांगितले.





# लोकप्रतिनिधी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सहकार्यातून लाभला हक्काचा निवारा

औरंगाबाद विभागातील हिंगोली जिल्ह्यामध्ये जन्मतः दिव्यांग असलेल्या मुलीला लोकप्रतिनिधी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सहकार्यातून हक्काचे घरकुल मिळाले आहे. अशीच एक यशोगाथा आहे, ती घरकुल लाभार्थी चित्रकला भवणजी पवनकर यांची!

ग्रामपंचायत बोरीशीकारी, तालुका व जिल्हा हिंगोली येथील रहिवासी असलेली चित्रकला भवणजी पवणकर जन्मत: गतीमंद असल्यामुळे आई वडिलांनी तिचा सांभाळ केला. पण म्हणतात ना संकटे जेव्हा येतात सर्व बाजूनी येतात असे काही चित्रकला पवनकर याच्या जीवनात घडले. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी वडीलांचे निधन झाले. त्यानंतर आईने अत्यंत बेताच्या परिस्थिती काबाड कष्ट करून सांभाळ केला. अशातच आईला दोन वर्षापूर्वी घरकुल मंजूर झाले, परंतु नशिबापुढे कोणीचीही चालत नाही. अशातच आई मयत झाल्यामुळे घरकुल बांधकाम कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला. कारण सदर मुलीला कोणत्याही प्रकारचे सामाजिक व व्यावहारीक ज्ञान नव्हते. पोटाची भूक भागविण्यासाठी गावात भीक्षा मागून उदरनिर्वाह करत असे. राहायला पक्के घरही नव्हते.

अशावेळी देवरूपी पंचायत समिती, हिंगोलीचे गटविकास अधिकारी, श्री. एम. पी. पोहरे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. जी. पी. बोथीकर, विस्तार अधिकारी श्री. एस. बी. तूप्पड व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री . आर. व्ही. कानडे यांनी गावातील सरपंच व ग्रामसेवक श्री झुंजारे यांच्याशी संपर्क करून सदर मुलीस हक्काचे घरकुल मिळवून द्यायचे ठरविले. त्या मुलीची परिस्थिती कोणाकडूनही लपलेली नव्हती त्यामुळे शासनालाही चित्रकला पवणकर हिला मदत करण्यास भाग पाडले.



त्यानुसार प्रधान आवास योजना-ग्रामीण सन २०१७-१८ अंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले. परंतु त्यानंतर खऱ्या अडचणींना सुरवात झाली. चित्रकला भवणजी पवणकर ही दिव्यांग असल्यामुळे कोणतीही बँक तिचे खाते उघडण्यास तयार नव्हती. त्यामुळे अनुदान वितरण करण्यास अडचण निर्माण झाली. परंतु पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी चित्रकला हिला घरकुल देण्याचा निर्धारच केला होता. अशा या सेवाभावी कार्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, श्री. आर. व्ही. कानडे व विस्तार अधिकारी, श्री. एस. बी. तूप्पड यांनी बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली व त्यांना सर्व हकीकत समजावून सांगून खाते उघडण्यास सांगितले. पंचायत समितीची अधिकारी यांचेकडून चित्रकला यांची हकीकत ऐकल्यावर बँक अधिकारी यांनी चित्रकला पवणकर हिचे बँकेत खाते उघडले. सदर खात्यावर पंचायत समितीकडून तात्काळ पहिला हप्ता जमा करण्यात आला.

घरकुल मंजूर झाले बँक खाती निधी उपलब्ध झाला परंतु घरकुल बांधकाम कोण करणार? त्यासाठी लागणारे साहित्य खरेदी व इतर आनुषंगिक बाबी कोण करणार असा प्रश्न उद्‌भवला. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. आर. व्ही. कानडे यांनी पुढाकार घेऊन गावातील लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या सहकार्यातून बांधकामास लागणारे साहित्य पासून ते बांधकाम पूर्ण करण्यापर्यंत सर्व मदत केली. घरकुल अनुदान सोबत गावातील उदार नागरिकानी सुद्धा काही आर्थिक मदत केली. जेणेकरूण घरकुल बांधकाम चांगल्या दर्जाचे होऊ शकेल. अशा प्रकारे निराधार दिव्यांग मुलगी असुनही लोकप्रतिनिधी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सहकार्यातून हक्काचे घरकुल उभे राहिले.



# गृह संकुल बांधकामासाठी दिली गावठाण जागा

कनकापूर-कांचने ग्रामपंचायत नाशिक विभाग आणि नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यामध्ये आहे. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या १९१५, एकूण कुटुंब संख्या ३७१ व एकूण पात्र घरकुल लाभार्थी संख्या १५ इतकी आहे. ग्रामपंचायत कनकापूर कांचने हे गाव देवळा तालुका मुख्यालयापासून १५ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. याच ग्रामपंचायतीच्या गृप ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध असा ऐतिहासिक शिवकालीन कांचन किल्ला आहे. ग्रामपंचायत कनकापूर-काचने मध्ये ग्रुप ग्रामपंचायत कनकापूर आहे. या गृपग्रामपंचायतीमध्ये कांचने या गावाचा समावेश असून हे गाव ऐतिहासिक कांचन किल्याच्या पायथ्याशी वसलेले आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत कनकापूर-कांचने ग्रामपंचायत अंतर्गत कांचने या गावात १ गृह संकुल बांधण्यात आले आहे. या गृहसंकुलामध्ये ७ लाभार्थी कुटुंब राहतात. कांचने या गावात ९७ कुटुंबे वास्तव्यास आहेत. कांचने गावातील १५ लाभार्थ्यांना केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंर्तगत घरकुल मंजूर झाल्यानंतर ग्रामपंचायतीने घरकुल बांधकामासाठी गावठाण क्षेत्रात जागा उपलब्ध करून दिली. या ठिकाणी घरकुल कॉलनी म्हणजेच गृह संकुल बांधण्याचा निर्णय ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व लाभार्थ्यांनी घेतला. त्यानुसार गृह संकुल बांधकामाचे नियोजन ग्रामपंचायतीने तयार करून प्रत्यक्षात गृह संकुल बांधकामास सरुवात करण्यात आली. लाभार्थ्यांची मेहनत, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांचे सहकार्य व शासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनातून अत्यंत अल्प कालावधीत गृह संकुल उभारण्यात आले. या गृह संकुलाच्या प्रत्येक घरावर एकच कलर देण्यात आला. त्याचप्रमाणे योजनेचे नाव व लोगोसह लाभार्थीचे पती-पत्नी यांचे संयुक्त नाव घरावर टाकण्यात आले.

या गृह संकुलातील घरकुल लाभार्थ्यांना घरकुलासह विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून घरकुल बांधकामासाठी ग्रामपंचायत गावठाण जागा उपलब्धता, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून घरकुल लाभार्थीना मजूरी स्वरुपात रू. २१४२०/- इतका रोजगार, स्वच्छ भारत मिशन(ग्रा) मधून शौचालयासाठी रू. १२०००/-, जल जीवन मिशन मधून नळ कनेक्शन व बचत गटाच्या माध्यमातून महिलांना उपजिविकेच्या साधनांची उपलब्धता इ. चा लाभ देण्यात आला.

ग्रामपंचायत कनकापूर-कांचने येथील गृह संकुलास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीम. लीना बनसोड यांचेसह उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) श्री. परदेशी यांनी भेट दिली. यावेळी श्रीमती लीना बनसोड यांनी घरकुल लाभार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या हस्ते घरकुल लाभार्थीना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देऊन गृहप्रवेश सोहळा साजरा केला. याप्रसंगी ग्रामपंचायतीचे सरपंच, श्रीम. चंद्रकला श्रावण गांगुर्डे, ग्रामसेवक, श्रीं. जे.बी.आहेर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, श्री.आर.के.शिरसाठ, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंर्तगत गृह संकुलाच्या माध्यमातून घरकुल मिळाल्यामुळे आमची निवारा हि गरज पूर्ण झाली. आज आम्हाला आमच्या हक्काच्या घरकुला सोबत इतर योजनांमधून लाभ मिळाल्यामुळे आम्हला त्याचा देखील फायदा झाला. यामुळे आमचे सर्व कुटुंब आनंदात व खेळीमेळीच्या वातवरणात जीवन जगतो आहे. या गृह संकुलामुळे आम्हाल मनस्वी आनंद होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.





# महा आवास अभियानात कोल्हापूरची सर्वोत्तम कामगिरी

कोल्हापूर शहर पंचगंगा नदीच्या काठावर वसलेले आणि सह्याद्री पर्वत रांगा सभोवताली आहेत. तसे ऐतिहासिक किल्ले, मंदिरे आणि पूर्व रॉयल्सच्या राजेशाही ठिकाणांसाठी प्रसिद्ध शहर आहे. भारताची वैभवता आणि भव्यता शोधण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे. भारतीय हस्तकलेच्या चमड्यांचे चप्पल, कोल्हापुरी चप्पल आणि तिच्या खासगी स्थानिक दागिन्यांसाठी विशेष प्रसिद्ध हार कोल्हापुरी साज नावाचे आहे. कोल्हापूर श्री महालक्ष्मी मंदिरसाठी प्रसिद्ध आहे. भोसले राजवंश कोल्हापूरचे सुप्रसिद्ध राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या संततींचे वंशज म्हणून अभिमानाने राहतात.

राज्यात दि. २० नोव्हेंबर, २०२० ते ५ जून, २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये विविध उपक्रम राबवून कोल्हापूर जिल्ह्याने सर्वोत्तम कामगिरी केली आहे.

अभियान कालावधीत उद्दिष्टपूर्तीसाठी जे लाभार्थी कमी जागे अभावी स्वत:च्या हक्काच्या घरापासून वंचित होते, अशा लाभार्थीसाठी बहुमजली इमारती बांधकाम करून लाभार्थ्यांना त्यांचे हक्काचे घर दिले. भूमिहीन लाभार्थ्यांना शासकीय जमीन घरकुल बांधकामासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. मात्र ज्या गावांमध्ये शासकीय जागा उपलब्ध नाही, अशा ठिकाणच्या भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ५०० चौ. फु. पर्यंत जागा खरेदीसाठी रु. ५००००/- अर्थसहाय्य पंडित दिन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजनेतून देण्यात आले. घरकुल लाभार्थीना विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. महा आवास अभियानामध्ये जिल्ह्यामधील सर्व १२ पंचायत समिती मध्ये डेमो हाऊसेस उभारण्यात आली. या डेमो हाऊसेसची उभारणी करतात स्थानिक स्वराज्य संस्था, सन्माननिय पदाधिकारी, NGO यांच्यामार्फत सहाय्य उपलब्ध करून जिल्ह्यामधील सर्व पंचायत समितीमध्ये उत्कृष्ट दर्जाचे व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल असे डेमो हाऊसेसची निर्मिती केली.

अभियान कालावधीत लाभार्थ्यांचे आधार सिडिंग, जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करण्याकरिता युध्दपातळीवर प्रयत्न केले. शासकीय योजना कृतीसंगम व नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे नियोजन जिल्ह्यामध्ये केले. त्यानुसार सदर उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे झाल्याचे दिसून येते. याकामी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार व गुणवत्तापूर्ण काम पूर्ण केले. यासाठी आढावा सभा, उत्तम प्रकारचे अहवाल सादरीकरण, VC, क्षेत्रीय भेटी, वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण, योजनेबाबत गाव पातळीपर्यंत प्रचार, प्रसिद्धी व जन जागृती करण्यात आली. तालुका स्तरावरून गट विकास अधिकारी व त्याचे अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करून आपला तालुका व स्वाभाविकपणे जिल्ह्याच्या गुणवत्ता वाढीसाठी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन अभियान कालावधीत मोलाचे योगदान दिले.

कोल्हापूर जिल्ह्याचे सुपुत्र मा. मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ यांच्या दूरदृष्टी व कुशल नियोजनाखाली त्यासोबतच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संजयसिंह चव्हाण, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, श्री. रवि शिवदास, जिल्हा प्रोग्रामर, श्री. चंद्रकांत पाटील यांच्या अथक प्रयत्नाने महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे पूर्ण झाल्याने गोरगरीब, भूमिहीन, गरजू व बेघर कुटुंबांना हक्काचे पक्के घरकुल मिळाले.






# पालघर मध्ये अभियानात आदर्श घरांची निर्मिती

राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गति व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ५ जून, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. अभियान कालावधीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून दर्जेदार घरांची निर्मितीसह लाभार्थ्यांना सर्व नागरी सुविधा (जसे- पिण्याचे पाणी, गटर व्यवस्था, पथ दिवे, रस्ते, सांडपाणी व घन कचरा व्यवस्थापन इ.) देवून आदर्श घरांची निर्मिती करण्यात आली. अभियान कालावधीत मुलभूत नागरी सुविधा देवून आदर्श घरांच्या निर्मितीसाठी पालघर जिल्ह्याने रोटरी जिल्हा ३१४१ च्या मदतीने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला आहे.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच आदिवासी विभागाकडील शबरी आवास योजना, रमाई आवास योजना व आदिम आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना सर्व नागरी सुविधायुक्त एक आदर्श घरकुल देण्यासाठी रोटरी क्लब मधून रक्कम रू. ७००००/- इतकी आर्थिक मदत एक घरकुलासाठी करण्यात आली. वाडा तालुक्यामध्ये एकूण ३२९ घरकुले रोटरी क्लब मधून बांधकामासाठी घेण्यात आली. त्यापैक्की २०० घरकुले पूर्ण झाली असून बांधकामाचा दर्जा उत्तम होण्यासाठी रोटरी क्लब तर्फे गृह निर्माण अभियंता यांची नेमणूक केली. त्यासोबतच रोटरी क्लबचे अधिकारी या घरकुलांची वेळोवेळी तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन करतात. लाभार्थ्यांना उत्तम दर्जाचे घरकुल देण्याकरीता घरामध्ये किचन ओटा, संपूर्ण घराला प्लास्टर, संडास-बाथरूम मध्ये टाईल्स या स्वरूपाचे पक्के व आकर्षक बांधकाम करून दिले जाते. त्याचप्रमाणे रोटरी क्लब तर्फे घरकुल पूर्ण झाल्यावर घरामध्ये लाईट फिटिंग, पंखे, ट्यूब लाईट व अंतर्गत इलेक्ट्रीफीकेशनसाठी सुद्धा मदत केली जाते.

वाडा तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजने मधील घरकुलांना रोटरी क्लब या संस्थेने दिलेल्या सुविधांमुळे लाभार्थ्यांच्या जीवनमानात प्रचंड बदल झाला आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या घरकुलामध्ये सर्व सुविधायुक्त व परिपूर्ण घरकुल मिळाल्यामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसोंडून वाहतो आहे.

वाडा तालुक्यातील एका ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक यांनी प्राधान्यक्रम यादीनुसार घरकुल मंजूर होणार या बाबत माहिती दिली. श्री. अशोक शांताराम डगला यांचे घरकुल निवड यादीत नाव आहे, हे ऐकल्यावर त्यांना खुप आनंद झाला. त्यांचे पुर्वीचे घर व जिथे घर बांधणार याचे फोटो काढण्यात आले. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०१९-२०२० या वर्षात घरकुल मंजूर करण्यात आले. खाते क्रमांक व घरकुल संबंधीत माहिती यापुर्वीच घेतली असल्याने लाभार्थीला अनुदानाचा पहिला हप्ता तात्काळा मिळाला. पहिला हप्ता प्राप्त होताच विनाविलंब घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली. बांधकाम प्रगतीत असताना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समितीतील अधीकारी यांनी वेळोवेळी भेटी दिल्या. त्यानुसार श्री. अशोक शांताराम डगला यांना बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुदानाच्या रक्कमा त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आल्या. त्यासोबतच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून मजूरीचीही रक्कम मिळाल्याने घरकुल बांधकामास मदत झाली. त्याबरोबर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर व पंचायत समिती, वाडा यांच्या सहकार्याने रोटरी जिल्हा ३१४१ च्या माध्यमातुन घरकुलासाठी रू. ७००००/- अधिकचे अर्थसहाय्यासह माझ्या घराला प्लास्टर, रंग, किचन ओटा व फरशी इ. सुविधा देण्यात आल्या. पुर्वी कुडाच्या घरात राहणारा मी व माझे कुटुंबाने पाहीलेले अनेक दिवसांपासुनचे पक्क्या घराचे स्वप्न प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रोटरी क्लबच्या मदतीने पुर्ण झाले असल्याचे श्री. अशोक शांताराम डगला यांनी सांगितले.




राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महा आवास अभियान २०२०-२१
विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा








पुरस्कार वितरण
२०२०-२०२१
तालुकास्तरीय







# महाआवासमुळे गरिबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण

। मंत्री हसन मुश्रीफ । कागलमधील ग्रामपंचायती, घरकुलधारकांना पारितोषिक विरतण

कागल : प्रतिनिधी

महाआवास योजनेच्या माध्यमातून गोरगरिबांच्या स्वतःच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. या अभियानांतर्गत गेल्या १०० दिवसांत विविध योजनांमधील तब्बल पाच लाख घरकुले पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

कागल पंचायत समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मंत्री मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमात ग्रामपंचायती व घरकुलधारकांना पारितोषिकांचे वितरण झाले.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, राज्यात पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, शबरी आवास योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून सुरू असलेल्या घरकुलांची कामे रखडलेली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून महाआवास अभियान सुरू केले. अवघ्या शंभर दिवसांतच चांगली फलनिष्पत्ती झाली.

जि. प. सदस्य युवराज पाटील म्हणाले, विविध योजनांच्या माध्यमातून मंजूर होणाऱ्या घरकुल अनुदानाची रक्कम सव्वा लाखाऐवजी अडीच लाख होणे गरजेचे आहे.

अंबरीश घाटगे म्हणाले, मागील पाच वर्षांत पंचायत राज्यव्यवस्थेला अक्षरशः मरगळ आली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी पंचायतराज व्यवस्थेला खऱ्याअर्थाने ऊर्जितावस्था आणली. पं. स. सभापती रमेश तोडकर म्हणाले, निधीसह अन्य तांत्रिक कारणांमुळे रखडलेल्या लाखो घरकुलांचे काम महाआवास योजनेअंतर्गत पूर्ण झाले आहे. अर्जुनीचे सरपंच सुनील देसाई यांनी मनोगत व्यक्त केले.

स्वागत व प्रास्ताविक गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी केले.

यावेळी जि.प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक रवी शिवदास, उपसभापती मनीषा सावंत, पंचायत समिती सदस्य आर. एस. पाटील, शशिकांत खोत आदी मान्यवर उपस्थित होते.



कागल : महाआवास अभियानांतर्गत रमाई आवास योजनेतील सर्वोत्कृष्ट घरकुल पुरस्कार बाळूबापू हेगडे यांना वितरण करताना ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ. यावेळी युवराज पाटील, अमरीश घाटगे, अजय माने, रवी शिवदास, रमेश तोडकर, मनीषा सावंत, सुशील संसारे व इतर.

# गरिबांना घरकुले देण्यात महाराष्ट्र देशात पुढे : मुश्रीफ

कागल येथे महाआवास अभियान पुरस्कार कार्यक्रम

कागल : विविध योजनांमधून राज्यात सुरू असलेली घरकुलांची कामे अनेक कारणांनी रखडलेली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून राज्यात २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीसाठी आपण महाआवास अभियान राबविले आणि अवघ्या शंभर दिवसांत आठ लाखांपैकी पाच लाख घरकुले पूर्ण झाली. उर्वरित घरेही येत्या चार महिन्यांत पूर्ण करू. गरिबांना घरकुले देण्यात महाराष्ट्र देशात पुढे असेल, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सोमवारी केले.

महाआवास अभियानांतर्गत जाहीर केलेल्या पुरस्कार योजनेतील कागल पंचायत समिती स्तरावरील पुरस्कारांचे वितरण सोमवारी मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जि.प. सदस्य अंबरीश घाटगे, युवराज पाटील, सभापती रमेश तोडकर, उपसभापती मनीषा सावंत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी माने, रवी शिवदास, आदी मान्यवर व सर्व पंचायत सदस्य, पुरस्कार विजेत्या ग्रामपंचायतीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी केले. यावेळी विविध मान्यवरांची भाषणे झाली.



कागल येथे महाआवास अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्वोत्कृष्ट घरकुलाचा पुरस्कार राजेंद्र पांडुरंग पाटील, रा. उंदरवाडी यांना ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी युवराज पाटील, अंबरीश घाटगे, उपसभापती मनीषा सांवत, जयदीप पोवार, इतर उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार सर्वोत्कृष्ट क्लस्टर, तालुक्यांचा गौरव

पालघर,दि.१४:: शासन निर्णय क्रमांक प्रभायो २०२०/प्र.क्र. १०७ / योजना १० दि. १० जून २०२१ अन्वये दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते दिनांक ५ जून २०२१ याया कालावधीत महाआवास अभियान राबविण्यात आले आहे. अभियाना अंतर्गत शासन निर्णय निकषांवर (भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, घरकुलांच्या उद्दिष्टाप्रमाणे १०० टक्के मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे, मंजुर घरकुले १०० टक्के भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, मंजुर घरकुले १०० टक्के आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे, डेमो हाऊसेस उभारणे, कायमस्वरूपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग / जॉब कार्ड मॅपिंग १०० टक्के पूर्ण करणे, शासकीय योजनांशी कृतीसंगम व नावीन्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी करणे, प्रलंबित घरकुले) मुल्यांकन करण्यात आले. त्याअनुसरूण खालीलप्रमाणे सर्वोत्कृष्ट तालुका, क्लस्टर, ग्रामपंचायत व ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरीता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्था निवड करण्यात आलेले आहे. त्यापैकी प्रथम क्रमांक मिळालेल्या संस्थाना दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी मा. पालकमंत्री पालघर जिल्हा तथा कृषी मंत्री, महाराष्ट्र दादाजी भुसे यांच्या गौरवण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्प संचालक माणिक दिवे (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पालघर ) यांनी दिली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेअंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुका म्हणून जव्हार तालुका सर्वोत्कृष्ट क्लस्टर म्हणून आबिटघर ता.वाडा सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत सातीवली ता.पालघर यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. तर ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्थांची शाखा जव्हार ची प्रथम क्रमांकावर निवड करण्यात आली आहे. राज्यपुरस्कृत आवास योजने अंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुका मोखाडा, सर्वोत्कृष्ट क्लस्टर पोशेरा (मोखाडा ), सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत सावदे (मोखाडा) म्हणून प्रथम क्रमांक मिळाला आहे. तसेच प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य मंत्री आवास योजना अंतर्गत जिल्ह्यातील घरकुले बांधण्यास विशेष योगदान देणारे जिल्हा प्रभारक धनंजय पाटील आणि जिल्हा डेटा एंट्री ऑपरेटर कमलेश गुणगुणे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

ते उद्घाटन

२३ ते २५ ऑगस्ट दरम्यान मेरिट लिस्ट लागेल. दि. २७ ते ३० ऑगस्ट दरम्यान महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे. दुसऱ्या फेरीची प्रक्रिया दि. ३१ ऑगस्टला, तिसरी फेरी दि. ५ सप्टेंबरला, चौथी फेरी दि. १२ सप्टेंबरला होणार आहे. विद्यार्थ्यांना https://11thadmission.org.in या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश घेता येणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेत औरंगाबाद जिल्हा परिषद प्रथम

विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या हस्ते सन्मानपत्र वाटप



# महा आवास अभियानांतर्गत विभागस्तरीय पुरस्कारांचे आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते वितरण

# घरकुल के सराहनीय कार्य पर अकोला जिप सम्मानित



# लोकसहभाग वाढवू, घरकुलाचे स्वप्न साकारू

प्राजक्ता लवंगारे-वर्मा : गोंदिया व वर्धा जिल्ह्याने पटकावला प्रथम पुरस्कार



राज्य पुरस्कृत आवास योजनेत वर्धा प्रथम

# घरकुल योजनेत ४०० कोटींची गुंतवणूक

पाच वर्षांत ९० टक्के घरांची उभारणी; सामाजिक परिवर्तनासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे महत्त्वपूर्ण योगदान

नीरज राऊत, लोकसत्ता

पालघर : पालघर जिल्हा परिषदेने सन २०१६ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत मर्यादित मनुष्यबळात ग्रामीण गृहनिर्माण योजनेअंतर्गत तब्बल ४०० कोटी रुपयांहून अधिक निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविला आहे. जिल्ह्यात २८ हजार ६२३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. यामुळे या कुटुंबीयांचा सामाजिक स्तर उंचावण्यात तसेच त्यांच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवण्यास जिल्हा परिषदेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**आशियाना योजनेंतर्गत लाभ**

घरे बांधल्यानंतर उपलब्ध झालेल्या निधीमध्ये ४० ते ६० टक्के लाभार्थ्यांना घराचे प्लास्टर व फरशी (फ्लोरिंग) पूर्ण करता आले नसल्याचे दिसून आले होते. पावसाळ्यात या घरांमध्ये गैरसोय होत असल्याचे दिसून आले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने रोटरी क्लबच्या मदतीने अशा घरकुलांचे प्लास्टर, फरशी काम तसेच घरामध्ये स्वयंपाक घर, बाथरूम- शौचालय उभारण्याचे व घरामध्ये विद्युत व्यवस्था करण्यासाठी ७० हजार रुपयांची अतिरिक्त मदत देण्याची 'आशियाना' योजना वाडा तालुक्यात राबवली आहे. येथील ३५० घरकुलांना ही मदत देण्यात आली आहे. उर्वरित २०० लाभार्थ्यांना मदत दिली जाणार आहे. सामाजिक संस्थांकडून सुमारे ३५० लाख रुपयांच्या मदतीमुळे घरांना झळाळी प्राप्त झाली आहे. रोटरी तसेच इतर सामाजिक संस्थांच्या मदतीने योजना १५०० घरांपर्यंत विस्तारित करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.

**घरकुल योजनेंतर्गत उद्दिष्ट**

| तालुका | घरकुल |
|---|---|
| डहाणू | ८०६८ |
| जव्हार | ३९९६ |
| मोखाडा | ४५२१ |
| पालघर | ३२३५ |
| तलासरी | ४११९ |
| वसई ग्रामीण | ७६५ |
| विक्रमगड | ४२७० |
| वाडा | ३०७४ |

सन २०१६ पासून जिल्ह्यातील गरजूंकरिता ३२ हजार ४८ घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी ९० टक्के घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. अशा प्रत्येक घरकुलाला एक लाख २० हजार रुपयांचे अनुदान व त्याबरोबर २० हजार रुपयांची 'नरेगा' अंतर्गत अतिरिक्त सहाय्यता देण्यात येते. योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करणे, त्यांच्या बँक खात्यांची माहिती जॉब कार्डशी संलग्न करणे, त्याचप्रमाणे घरकुलाच्या मंजुरीनंतर बांधकामाच्या विविध टप्प्यांची पाहणी करून त्यांना टप्पानिहाय अनुदान (पान ३ वर)

# ना गिट्टी ना सळाख, तरीही पडतो स्लॅब

घराला पर्यावरणपूरक विटांचे छत

मटा विशेष

म.टा. विशेष प्रतिनिधी, नागपूर



विद्यार्थ्यांच्याही भेटी...



# महाआवास अभियानात मोखाडा तालुका प्रथम

सभापती सारिका निकम यांचा सत्कार



लोकमत न्यूज नेटवर्क

मोखाडा : महाराष्ट्र सरकारने राबविलेल्या महाआवास अभियान (घरकुल) मध्ये २०२० ते २०२१ या पहिल्याच वर्षात पालघर जिल्ह्यामध्ये मोखाडा तालुक्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच तालुक्यातील पोशेरा गट पालघर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने आला आहे. त्याचबरोबर आसे ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक व खोच ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना हक्काचा निवारा देणाऱ्या विविध योजना गतिमान करून घरकुलांच्या गुणवत्तावाढीसाठी राज्यात २० नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२१ या काळात महाआवास अभियान (ग्रामीण) राबवण्यात आले. राज्यात अपूर्ण असलेली घरकुले तसेच मान्यता न दिलेल्या घरकुल प्रस्तावांना मान्यता देऊन या १०० दिवसांत ८ लाख ८२ हजार १३५ घरकुले पूर्ण करण्याचा निर्धार महाराष्ट्र सरकारने केला होता. यामध्ये मोखाडा तालुक्याने अव्वल क्रमांक पटकावला आहे.

# महाआवास अभियानांतर्गत उत्कृष्ट घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना व ग्रामपंचायतीना पूरस्कार



# उत्कृष्ट जिल्हा परिषदेसह जिल्ह्यास आठ पुरस्कार

परभणीचा सन्मान : आयुक्तांच्या हस्ते सीईओंनी स्वीकारले पुरस्कार



# कोकण आयुक्तांकडून ठाणे जि.प.चा सन्मान

महाआवास अभियानात सरस कामगिरी



# नऊ हजार कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार

ग्रामीण भागात राबवले महाआवास अभियान : अधिकाऱ्यांचा पालकमंत्र्यांकडून सन्मान

# महाआवास अभियान तालुकास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



# महाआवास अभियानांतर्गत जिल्हास्तरीय पुरस्काराचे पालकमंत्री वर्षाताई गायकवाड यांच्या हस्ते वितरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

हिंगोली ■ २० नोव्हेंबर २०२० पासून ५ जुन २०२१ या कालावधीत महा आवास अभियान ग्रामीण राबविण्यात आले होते. सर्वांसाठी घरे २०२२ या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरकृत रमाई आवास योजना शबरी आवास योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचाची प्रभावी अंमलबजावणी करणे, कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा अभियानाचा उद्देश होता. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, मंजुरी देणे, पहिल्या हप्त्याचे वितरण करणे, शंभर टक्के भौतिक दृष्ट्या घरकुल पूर्ण करणे अशा विविध निकषांवरती गुणांकन करण्यात आले होते. या अभियाना अंतर्गत उत्कृष्ट तालुका, उत्कृष्ट क्लस्टर, उत्कृष्ट ग्रामपंचायत, उत्कृष्ट वित्तीय संस्था असे विविध पारितोषिके प्रदान करण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कारांत सर्वोत्कृष्ट तालुके प्रथम औंढा नागनाथ, द्वितीय हिंगोली, तृतीय कळमनुरी सर्वोत्कृष्ट क्लस्टर प्रथम टेंभुर्णी तालुका वसमत द्वितीय गिरगाव तालुका वसमत तृतीय हयातनगर तालुका वसमत उत्कृष्ट ग्रामपंचायत प्रथम नरवाडी, तालुका कळमनुरी द्वितीय मसोड तालुका कळमनुरी, तृतीय शेनोडी तालुका कळमनुरी. वित्तीय संस्था प्रथम महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा औंढा नागनाथ, द्वितीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा जवळाबाजार राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुके प्रथम औंढा नागनाथ, द्वितीय वसमत, तृतीय हिंगोली सर्वोत्कृष्ट क्लस्टर प्रथम पांगरा शिंदे तालुका वसमत द्वितीय येहळेगाव तालुका औंढा नागनाथ तृतीय खोर्डी तालुका हिंगोली सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत प्रथम पार्डी तालुका कळमनुरी द्वितीय कुंभारवाडी तृतीय जामगव्हाण तालुका कळमनुरी या सर्वांना वर्षाताई गायकवाड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पालकमंत्री तथा शिक्षण मंत्री वर्षाताई गायकवाड, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश कलासागर उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांनी महाआवास अभियाना बद्दल माहिती दिली, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जे. वी. मोडके यांनी केले, सहा. प्रकल्प संचालक गणेश बोथीकर ,जिल्हा प्रोग्रामर गणेश पाटील, मनोज पिनगाळे सचिन इंगोले, संतोष काळे महेश अकमार, अरुण बोधनकर, एस एम शेख, खंदारे, माले कार्यक्रमास उपस्थित होते. (प्रतिनिधी)



# आ.प्रशांत बंब यांच्या हस्ते खुलताबाद येथील घरकुल डेमो हॉऊसचे उद्घाटन

खुलताबाद । वार्ताहर

पंचायत समिती कार्यालय येथे खुलताबाद येथील घरकुल योजना डेमोचे उद्धघाटन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उत्कृष्ट काम करणारे लाभार्थी, सरपंच व ग्रामसेवक यांना सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले.

खुलताबाद येथील चांगलं कार्य करीत असल्याचा उल्लेख त्यांनी केला गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर व गटशिक्षण अधिकारी सचिन सोळंकी यांनी कोरोना काळात चांगल कार्य केलायचे आमदार बंब यांनी सांगतले. यावेळी पंचायत समितीचे बांधकाम उप अभियंता नरेंद्र देशमुख, बंनसोड ,भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, पं स सभापती गणेश नाना आधाने, उपसभापती युवराज ठेंगडे, पं.स सदस्य प्रकाश चव्हाण, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, अजीम मणियार व तसेच विस्तार अधिकारी कहाटे, अनिल घुगे, भाजपा जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर नलावडे ,अरुण आघाडे, आदि उपस्थित होते.



उत्कृष्ट काम करणारे लाभार्थी, सरपंच व ग्रामसेवक यांना सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन सन्मान



महा आवास अभियान उत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत व उत्कृष्ट घरकुल बांधकाम केलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार करताना आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह मान्यवर

# उत्कृष्ट घर बांधलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : महाआवास अभियान-ग्रामीण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना ग्रामीण योजनेमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या तालुक्यातील ग्रामपंचायत व उत्कृष्ट घरकुल बांधकाम केलेल्या लाभार्थ्यांचा बार्शी पंचायत समितीच्या वतीने आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपसभापती मंजुळा प्रमोद वाघमोडे, गटविकास अधिकारी शेखर सावंत, लायन्स क्लब रॉयलचे अध्यक्ष गणेश भंडारी, सचिव मंगेश बागुल, डॉ. तांबारे व सर्व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी लेखाधिकारी बाबासाहेब माने रेड्डी, वरिष्ठ सहाय्यक समित कांबळे, गृहनिर्माण अभियंता सौरभ काळे,ताकिर शेख यांनी परिश्रम घेतले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच व ग्रामसेवक यांनी हे सत्कार स्वीकारले.

सुर्डी प्रथम -सरपंच सुजाता डोईफोडे ,पांडुरंग कागदे, काळेगांव द्वितीय- सरपंच द्रोपदी धायतिडक, शुभदा पाटील, सावरगांव तृतीय-

**घराचं स्वप्न साकारण्यासाठी लाभ घ्या**

प्रत्येक नागरिकाचे आपले हक्काचे घर असावे असे स्वप्न असते. केंद्र व राज्य सरकार वैयक्तिक लाभार्थ्यांना घरासाठी अनेक योजना राबवत आहे तसेच अनुदान देत आहे. प्रत्येकाने गुणवत्ता ठेवून आपले बांधकाम करून घ्यावे, असे आवाहन केले तसेच या विभागाने देखील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली.

सरपंच रेखा बचुटे, राहुल तायडे

**रमाई आवास योजना**

खडकोणी प्रथम-सरपंच मैनाबाई कोलमिरे, महेश माने, सुर्डी द्वितीय- सरपंच सुजाता डोईफोडे, पांडुरंग कागदे, मानेगांव- तृतीय सरपंच शिवशाला कांबळे, अर्चना शिंदे

**प्रधानमंत्री आवास योजना**

महादेव बापू सुतार सुर्डी - प्रथम
शाहू सोपान मते झाडी - द्वितीय
बालाजी विठ्ठल गाडे पानगांव- तृतीय

**रमाई आवास योजना**

ज्ञानदेव पांडुरंग कटकधोंड मालवंडी - प्रथम, नागनाथ विठ्ठल रणदिवे कासारवाडी-द्वितीय, श्रीमती समाबाई रेवन भालेराव चारे - तृतीय



जालना येथे मा. मंत्री, आरोग्य, श्री. राजेश टोपे यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



औरंगाबाद येथे मा. मंत्री, उद्योग, खनिजकर्म आणि मराठी भाषा, श्री. सुभाष देसाई यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



लातूर येथे मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता, श्री. नवाब मलिक यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



जळगाव येथे मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, श्री. गुलाबराव पाटील यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण

"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास"




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४